| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २६२ वा | गुरूवार दिनांक ०१ जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## शेकडो महिला भगिनींच्या सहभागाने तुळजापुरात भव्य जलयात्रा उत्साहात संपन्न







धाराशिव,दि.२०(जिमाका):- श्री क्षेत्र तुळजापुरात श्री तुळजाभवानी देवींचा शाकंभरी नवरात्रोत्सव २८ डिसेंबरपासून अत्यंत भक्तिभावाच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात सुरू असून, या पवित्र उत्सवाचा एक महत्त्वाचा भाग असलेली भव्य जलयात्रा आज मोठ्या थाटामाटात संपन्न झाली. शेकडो महिला भगिनींच्या सहभागाने निघालेल्या या जलयात्रेमुळे संपूर्ण तुळजापूर नगरी भक्तिरसात न्हालेली दिसून आली.

धार्मिक मान्यतेनुसार देवी पार्वतीचा 'शाकंभरी' अवतार पौष शुक्ल अष्टमीच्या दिवशी साकार झाला. अन्नधान्य, वनस्पती आणि समृद्धीची अधिष्ठात्री देवी म्हणून शाकंभरी देवींची पूजा केली जाते. या श्रद्धेच्या पार्श्वभूमीवर तुळजापुरात दरवर्षी पौष शुक्ल अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत शाकंभरी नवरात्रोत्सवाचे आयोजन केले जाते. याच परंपरेनुसार यंदाही हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नवरात्रोत्सवातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या जलयात्रेला पापनाश तीर्थ कुंडातून प्रारंभ झाला. पवित्र जलाने भरलेले कलश डोक्यावर घेत, पारंपरिक वेशभूषेत शेकडो महिला भगिनींनी या जलयात्रेत भक्तिभावाने सहभाग नोंदवला. संबळाच्या कडकडाटात, ढोल-ताशांच्या गजरात, भक्तिगीतांच्या निनादात आणि 'आई राजा उदो उदो' च्या जयघोषात निघालेली ही मिरवणूक तुळजाभवानी मंदिरापर्यंत पोहोचली. गाभाऱ्यात विधिवत जलअर्पण करण्यात आले.

जलयात्रेतील रथावर विराजमान असलेल्या शाकंभरी देवींच्या प्रतिमेची विशेष आकर्षक सजावट करण्यात आली होती. विविध प्रकारचा भाजीपाला (शाक) आणि फळांचा वापर करून केलेली ही सजावट भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. अन्नधान्य व समृद्धीचे प्रतीक असलेल्या देवी शाकंभरींच्या या स्वरूपाने भाविकांमध्ये श्रद्धा, कृतज्ञता आणि भक्तिभाव अधिक दृढ झाला.

या भव्य जलयात्रेत महिला भगिनींसोबतच गोंधळी, आराधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या तालावर आणि भक्तिरसपूर्ण वातावरणात संपूर्ण मिरवणूक अत्यंत आनंदी व भक्तिमय वातावरणात पार पडली. मिरवणुकीत सहभागी झालेले घोडे आणि सजवलेल्या बैलगाड्या या देखील भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरल्या.

या पवित्र सोहळ्याला अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, विश्वस्त तथा तहसीलदार अरविंद बोळंगे, नगराध्यक्ष विनोद गंगणे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजी बुवा, महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, उपाध्ये बंडू पाठक, शाकंभरी नवरात्र उत्सवातील यंदाचे यजमान उल्हास कागदे, लेखाधिकारी संतोष भेंकी, सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर, सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, अनुप ढमाले, रामेश्वर वाले, राजकुमार भोसले, प्रवीण अमृतराव, अनिल चव्हाण, सिद्धेश्वर इंतुले, नागेश शितोळे, जयसिंग पाटील, महेंद्र आदमाने, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, अमरराजे कदम, अनंत कोंडो, प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांच्यासह मंदिर संस्थानचे अधिकारी-कर्मचारी, पुजारी बांधव तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्राईम न्युज

### दोन म्हैस व रेडकूची अज्ञाताने केली चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रोहीत किसन भुसारे, वय २५ वर्षे, रा. महादेववाडी ता. जि. धाराशिव यांचे महादेववाडी शिवारातील गोठ्यातुन दोन म्हैस व एक रेडक असे एकुण ४४,०००किंमतीचे दि.२७/१२.२०२५ रोजी १९.०० ते दि.२८.१२.२०२५ रोजी ०७.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रोहीत भुसारे यांनी दि.३०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पाणबुडी मोटारची चोरी

वाशी(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दत्ता अच्युत काकडे, वय ३५ वर्षे, रा. वाशी ता. वाशी जि. धाराशिव यांचे वाशी शिवारातील शेताजवळील तळ्यातील सुदर्शन कंपनीची ३ एचपीची पाणीबुडी मोटर एकुण १४,५०० किंमतीची ही दि.२८.१२.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दत्ता काकडे यांनी दि.३०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वाहनाची आग लावून जाळपोळ व तोडफोड करुन केले नुकसान

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२९.१२.२०२५ रोजी कडकनाथवाडी शिवारातील टाटा पावर रेनयुव्हेबल एनर्जी लिमीटेड कळंब कंपनीचे स्टोअरेज यार्ड येथे अज्ञात १५ ते २० इसमांनी अज्ञात कारणाने टाटा पावर रेन्युव्हेबल एनर्जी लिमीटेड कळंब कंपनीचे वाहनाची आग लावून जाळपोळ व तोडफोड करुन अंदाजे ८,००,००००० चे नुकसान केले आहे. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-फैज अन्वर फैजी, वय २९ वर्षे, व्यावसाय संगवी मुव्हर्स लिमीटेड कंपनीत साईट सुपरवायझर रा. न्यु शितलनगर व्हिटीसी जालिंदर-१ जि. जालिंदर पंजाब ह.मु. शिवाजी चौक वाशी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.३०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे येरमाळा येथे ` गुन्हा नोंदवला आहे.

### लैंगीक अत्याचार

क ळ ंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २५ वर्षीय महिला दि.१७.०१.२०२५ते १४.१२.२०२५ रोजी हिस एका गावातील एका तरुणाने लग्नाचे अमिष दाखवून त्याचे शेतातील घरी घेवून जावून तिस शिवीगाळ करुन मारहाण करुन तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.३०.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम-६४(१),६४(२)(एम), ११५(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या बैठका संपन्न – खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर




कानेगाव, जेवळी, सास्तूर व माकणी येथे जिल्हा परिषद गट शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या आढावा बैठका उत्साहात संपन्न आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ता. लोहारा येथील सास्तूर, जेवळी, कानेगाव व माकणी या जिल्हा परिषद गटांमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सखोल आढावा बैठका संपन्न झाल्या. या सर्व बैठका माझ्यासह आमदार श्री. प्रवीण स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या.

या बैठकीदरम्यान संबंधित गटांतील आजवर झालेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यात हाती घ्यावयाच्या स्थानिक विकासकामांचे नियोजन, संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे, बूथस्तरावर कार्यकर्त्यांची प्रभावी नियुक्ती, मतदारांशी थेट संपर्क वाढविणे, नागरिकांच्या मूलभूत समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना सांगण्यात आले की, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक ही केवळ राजकीय लढत नसून जनतेच्या विश्वासाची आणि कार्यकर्त्यांच्या निष्ठेची खरी कसोटी आहे. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा प्रतिनिधी असून जनतेच्या प्रश्नांशी प्रामाणिक राहणे, विकासाची स्पष्ट व ठोस भूमिका मांडणे आणि पक्षाची धोरणे घराघरात पोहोचवणे हीच यशस्वी निवडणुकीची खरी गुरुकिल्ली आहे.

संघटनेत कोणताही मतभेद न ठेवता सर्व पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी एकदिलाने, एकजुटीने व शिस्तबद्ध पद्धतीने कामाला लागावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यकर्त्यांच्या ताकदीवर, जनतेच्या विश्वासावर आणि संघटनाच्या बळावर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये यश निश्चित असल्याचा ठाम विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने तयारीनिशी निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असून शेतकरी, युवक, महिला, कामगार व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आघाडी सातत्याने लढत राहील, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले या बैठकीस सास्तूर, जेवळी, कानेगाव व माकणी जिल्हा परिषद गटांतील पदाधिकारी, माजी पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अधिकारमित्र पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन; ६ जानेवारीपर्यंत मुदत

धाराशिव (जिमाका)- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद व जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत 'अधिकारमित्र' पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.समाजसेवेची आवड असलेल्या आणि शासनाच्या योजनांची जनजागृती करण्याची इच्छा असलेल्या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पदासाठी शिक्षक (सेवानिवृत्त शिक्षकांसह), सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी,एम.एस.डब्ल्यू.चे विद्यार्थी व शिक्षक,ज्येष्ठ नागरिक,अंगणवाडी कार्यकर्ते,विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी (जोपर्यंत ते वकील म्हणून नोंदणीकृत नाहीत तोपर्यंत), अराजकीय सेवाभावी संस्था व क्लबचे सदस्य,परिसरातील महिला गट,मैत्री संघ,स्वयंसहायता गटातील सदस्य तसेच दुर्लक्षित व दुबळ्या घटकांतील इतर उमेदवार अर्ज करू शकतात.

उस्मानाबाद तालुक्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,उस्मानाबाद येथे आणि इतर तालुक्यांसाठी संबंधित तालुका विधी सेवा समिती येथे अर्ज सादर करावेत. अर्जाचा नमुना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व सर्व तालुका विधी सेवा समिती कार्यालयात उपलब्ध आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख ६ जानेवारी २०२६ असून,त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अर्ज करण्याबाबतची पात्रता,अटी व नियम यांची सविस्तर माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,तालुका विधी सेवा समिती, पंचायत समिती,तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या सूचना फलकावर उपलब्ध असल्याचे कळविण्यात आले आहे.

निवड झालेल्या अधिकारमित्रांना कार्यालयीन उपक्रमांसाठी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत किंवा क्षेत्रीय कामकाजासाठी कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार काम करावे लागणार असून त्यासाठी ७५० रुपये प्रतिदिन मानधन देण्यात येणार आहे.

तरी पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा व ६ जानेवारी २०२६ पूर्वी संबंधित कार्यालयात अर्ज सादर करावेत,असे आवाहन सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,उस्मानाबाद यांनी केले आहे.

## शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन



धाराशिव (प्रतिनिधी) शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे सहकारी पतसंस्थेच्या सन २०२६ वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन मंगळवारी ( दि.३०)रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (देवगिरी प्रांत) प्रदेशाध्यक्ष मा. प्रा. श्री सचिन कंदले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शहरातील पोलिस लाईन समोरील संस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या दिनदर्शिका प्रकाशन कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा अभाविप राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य प्रा. डॉ. हंसराज उर्फ सारंग जोशी, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (देवगिरी प्रांत) प्रदेश संघटन मंत्री सिध्देश्वर लटपटे प्रा. गोपाळ धोंड (बीड) धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य देविदास पाठक, जीवनमूल्य व्यसनमुक्ती निसर्गोपचार केंद्र धाराशिव संचालक ब्रम्हाकुमार सुरेशभाई जगदाळे, अभाविप जिल्हा विस्तारक अजय टोले,श्री साई श्रद्धा एज्युकेशनचे संचालक प्राचार्य सोमनाथ लांडगे, दैनिक एकमतचे पत्रकार सुभाष कदम-पाटील, वाडी बामणी येथील तुळजाई . विदयालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र जाधव, वाडी बामणी वि. का. से. सो. माजी चेअरमन बाळसाहेब नरवडे, प्रा. जाधव सर, डॉ वसंत मुंडे, महादेव सुर्यवंशी, भाजपा युवा नेते अनिकेत कोळगे यांची उपस्थिती होती.यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश सचिव माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळगे यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी शिवजित तीर्थकर, श्रीकांत शेरखाने, विश्वजीत पारदे, शंकर कोळगे, इम्रान पठाण, रत्नदीप मडके, विकास कदम, कृष्णा कुलकर्णी, प्रथमेश गुंड, काकासाहेब माने यांच्यासह संस्थेचे संचालक तेजसिंह कोळगे, व्यवस्थापक शाम गंगावणे, कर्मचारी वैशाली जोशी, मंगल राठोड, श्रीकांत काशिद सभासद, हितचितक यांची उपस्थिती होती

## वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी धाराशिव येथे इंडक्शन प्रोग्राम उत्साहात संपन्न

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-व्ही पी शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला इंडक्शन (परिचय) प्रोग्राम उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व मार्गदर्शक करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना प्रभारी प्राचार्य डॉ. पूजा आचार्य यांनी महाविद्यालयाचे नियम, शिस्त तसेच शैक्षणिक वातावरणाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित डॉ. सचिन टिक्के (प्रमुख, पंचकर्म विभाग, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय) यांनी फिजिओथेरपीचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, या क्षेत्रातील वाढती गरज व भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

महाविद्यालयाचे व्यवस्थापक श्री. अमर कवडे यांनी कॅम्पसची रचना, उपलब्ध सुविधा व विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सोयी-सुविधांचा आढावा घेतला. तर डॉ. गणेश गोरे यांनी परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमाची माहिती देत विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासाची ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी प्रेरणा देवरे व रिया शिंदे यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. महिमा चाकवते यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे सर्व विद्यार्थी तसेच डॉ. पूजा आचार्य, डॉ. गणेश गोरे, डॉ. महिमा चाकवते, डॉ. स्वतेजा चोपडे, डॉ. समृद्धी मेहेत्रे, डॉ. तेजश्री सोलवट, डॉ. प्रतीक गमरे, वरिष्ठ लिपिक कृष्णा दळवी, मंगल कोरे व संग्राम क्षीरसागर यांनी विशेष परिश्रम घेतले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## आता विरोध, नंतर युती-आघाडी निश्चित!

राज्यातील महानगरपालिकेची निवडणुका प्रक्रिया चालू असून अनेक ठिकाणी युती किवा आघाडीत बिघाडी झाली आहे. सत्ताधारी विरोधी गटाकडे तीन अशी युती व आघाडीत पक्ष आहेत. सत्तेत तीन असून अनेक ठिकाणी युती फिस्कटली आहे. मुंबई महानगरपालिकेत मात्र भाजपा व एकनाथ शिंदे यांच्या युती झाल्याचे सांगण्यात येते. इतर ठिकाणी जसे छत्रपती संभाजीनगरमध्ये दोघे एकत्र येऊ शकले नाहीत. मुळात सर्वांना स्वबळावर निवडणुक लढायाची आहे. जे नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषदामध्ये घडले तेच महानगरपालिकेत होईल असे वाटत आहे. अनेक ठिकाणी युती किंवा आघाडी होऊ शकली नाही असे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपाच मोठा भाऊ ठरला आहे तसे याही महानगरपालिकेच्या निवडणुकीत होण्याची अकांक्षा मनात ठेऊन वाटचाल होताना दिसून येत आहे. महानगरपालिकेची निवडणुका अनेक वर्षानंतर होत आहेत. पुर्वी दोन पक्षात होणारी निवडणुक बहुपक्षात होताना दिसून येत आहे. भाजपाचे सावध पावले पडत आहेत. त्यांनी जो सोबत येतो व आपल्या मर्जीत बसेत असेल तर युती करीत असल्याचे जाणवत आहे. मुंबईत अजित पवार यांना सोडून युती केली असली तरी कमी जागा ह्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेस दिल्या आहेत. भाजपा सर्वसमान उमेदवार देण्यासाठी अधिक जागा स्वत:कडे घेत आहेत. गुजराती बरोबर इतरांना जागा वाटप केल्याचे दिसून येत आहे. मुंबई ही राज्यातील श्रीमंत अशी महानगरपालिका आहे. मोठे बजेट असलेली महानगरपालिका आहे. त्यामुळे भाजपाला स्वतंत्र अशी ताकद आजमावण्याचा प्रयत्न आहे. दुसरी कडे महानगरपालिकेच्या तोंडावर ठाकरे बंधु एकत्र आले आहेत. तेच जर एक-दोन महिण्यापुर्वी एकत्र आले असते तर चांगला प्रचार झाला असता. अगदी निवडणुकीच्या तोंडावर एकत्र येणे म्हणजे केवळ महानगरपालिकेची निवडणुक जिंकण्यासाठी एकत्र आल्याचे बोलत आहेत. वास्तविक मुंबई महानगरपालिका ही शिवसेनेची आहे. येथे हिदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी अनेक वर्ष चालविली तसेच सांभाळली आहे. आज जे मोठे शिवसैनिक आहेत ते पुर्वी महापौर झालेली आहेत. हे विसरता येऊ शकत नाही. असे जरी असले तरी मराठी माणसाची मुंबई आहे. यात आता गुजराती समाजाचा भराणा अधिक आहे. मराठी माणसाची जपणुक कराणारा पक्ष शिवसेना समजली जाते. यात आता दुफळी निर्माण झाली. भाजपाकडे पुर्ण मराठी माणुस वळला जाईल असे नाही. मुंबईत एकनाथ शिंदे यांनी भाजपासोबत गेल्याने हिंदुत्वादी मते मिळण्यात मदत होणार आहे. त्याच प्रमाणे राज व उद्धव ठाकरे हेही स्वबळावर लढतील, त्यांना सुद्धा मुंबईसह इतर ठिकाणी किती पाठींबा मिळेल हे कळणार आहे. राज्यात जवळपास सर्वच ठिकाणी दुफळी निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. सर्वच राजकिय पक्षास आपली ताकद मजबुत आहे याची शाश्वती वाटत आहे. ज्या पक्षाने जनतेची कामे केली व करण्याची क्षमता आहे त्यालाच स्विकारले जाण्याची शक्यता आहे. जनता आता केवळ पाहात आहे. प्रत्यक्षात कोणता निर्णय घेतला ही बाब निवडणुक निकालानंतर कळणार आहे. सध्याला तसे पाहिले तर मुंबईत गुजराती समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या सभा गाजणार, यात शंका घेण्याचे कारण नाही. हे दोघेही कळकळीचे आवाहन करणार त्यामुळे भाजपाकडे मोठ्या प्रमाणात गुजराती समाज आकर्षिला जाण्याची शक्यता आहे. सध्याला राज्यात मुंबईत वेगळीच लढत दिसून येणार आहे तर राज्यात इतर ठिकाणी वेगळीच परिस्थिती दिसून येण्याची शक्यता आहे. राज्यात भाजपाकडे उमेदवारी मागणाऱ्याची संख्या अधिक दिसून आली. त्यामुळे मुंबई वगळता काँग्रेस विरुद्ध भाजपा अशीच लढत होण्याची शक्यता आहे. हे दोन्ही जर पक्ष सोबती मिळाला तर घेतील, युती-आघाडी करतील नसता एकेले चलो रे नुसार वाटचाल होणार आहे. महानगरपालिकेची निवडणुका म्हटल्यातर सुशिक्षित मतदार असतो. शहरातील व ग्रामीण भागातील मतदार यात फरक आहे. त्यामुळे यावेळी विचारपुर्वक मतदान होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम आगामी निवडणुकीवर होणार आहे. जे भाजपा सोडून इतरपक्षात गेले व काही काँग्रेस सोडून गेले त्याना जनता स्विकारेलच असे नाही. जनता यावेळी निष्ठावंत कोण आहे. ज्यांना विकासबाबत खात्री आहे अशा उमेदवारास जनता स्विकारणार आहे. महानगरपालिकेची निवडणुक प्रदिर्घ काळानंतर होत आहे. उद्धव व राज ठाकरे एकत्र झाले आहेत. यामुळे कोणाचा फायदा व कोणाचा तोटा होईल हे निकालानंतर कळून येणार आहे. महानगरपालिकेच्या निकालावरून आगामी काळात कोणत्यापक्षाला चांगले भवितव्य असणार आहे हे कळून येणार आहे. राज्यातील ज्याकाही महानगरपालिकेच्या निवडणुका होत आहेत त्यापैकी मुंबईकडे लक्ष राहाणार आहे. एकदा का भाजपाकडे मुंबई हाती आली व राज व उद्धव ठाकरे यांना डावलेले तर आगामी काळात एकहाती व एकसुत्रीच कार्यक्रम दिसून येणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेची निवडणुक ही सर्वात महत्वाची ठरणारी आहे. यात कोणाचे वजन किती आहे. हे कळणार आहे. त्यापेक्षा ज्यांच्या पदरी अपयश आले ते यदाकदाचित संपणार! त्यामुळे सर्वात सावध भुमिका ही एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. अजित पवार यांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील असे वाटत आहे. काँग्रेसने सुद्धा सोबत कोण येईल या बाबत विचार न करता वाटचाल करीत आहे. काँग्रेसला चांगले दिवस येतील असा अंदाज आहे. त्यामुळे सर्व राजकिय पक्षासाठी आगामी काळातील भवितव्य कळून येणार आहे. आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर २०२९ ला विधानसभेच्या निवडणुकीस समोरे जावे लागेल. लोकसभा असली तरी राज्यातील जनतेला विधानसभा निवडणुक ही महत्वाची वाटते. त्यामुळे सर्व राजकिय पक्षाला, आले सोबत तर घेतले. नाही तर एकेले चलो रे ची भुमिका अंगीकारली जाणार आहे. निवडणुकी निकालानंतर कोण-कोण युती व आघाडी करेल हे दिसून येणार आहे. आज नाही तर निकालानंतर युती व आघाडीकडे पावले वळणार आहेत यात शंका घेण्याचे कारण नाही.

# सुगंधाचे गूढ जग : परफ्युमचे रसायनशास्त्र आणि मानवी मनावरील परिणाम

परफ्युम हे केवळ शरीराला सुगंधित करणारे द्रव्य नसून,ते रसायनशास्त्र आणि मानवी भावनांचा एक अद्भुत संगम आहे.नैसर्गिक आणि कृत्रिम संयुगांपासून बनवलेले हे सुगंध मानवी मन आणि आरोग्यावर महत्त्वपूर्ण परिणाम करतात.

रासायनशास्त्र वापर करून

सुगंधाची निर्मिती करणे ही एक रासायनिक कला आहे. प्राचीन काळापासून मानवाला सुगंधाचे आकर्षण राहिले आहे. फुले, फळे, लाकूड आणि इतर नैसर्गिक स्रोतांपासून मिळवलेले सुगंधित तेल वापरून परफ्युम बनवण्याची कला विकसित झाली आहे.आजच्या आधुनिक युगात,परफ्युमची निर्मिती ही एक प्रगत रसायनशास्त्रीय प्रक्रिया आहे, जी नैसर्गिक आणि हजारो कृत्रिम सुगंधित संयुगांचा वापर करून केली जाते.

परफ्युममध्ये मुख्यत्वे चार घटक असतात.

१. सुगंधी संयुगे : हे परफ्युमचा मुख्य गाभा असतात. यामध्ये नैसर्गिक तेले (उदा. गुलाबाचे, जाईचे तेल) आणि सिंथेटिक रसायने (उदा. एस्टर, अल्डीहाइड्स) यांचा समावेश असतो.

२. फिक्सेटिव्ह्ज : हे घटक सुगंध दीर्घकाळ टिकवून ठेवण्यास मदत करतात. ते बाष्पीभवन होण्याचा वेग कमी करतात.

३. द्रावक : सामान्यतः इथेनॉल किंवा पाणी हे द्रावक म्हणून वापरले जाते, जे सुगंधी संयुगे मिसळण्यास आणि पातळ करण्यास मदत करते.

साधारण पणे परफ्युमचा सुगंध एकाच वेळी जाणवत नाही, तर तो टप्प्याटप्प्याने विकसित होतो. या टप्प्यांना नोट्स म्हणतात.

नोट्स चे एकुण तीन प्रकार आहेत.

१. टॉप नोट : परफ्युम लावल्यानंतर लगेच येणारा हा सुरुवातीचा सुगंध असतो. हा हलका असतो आणि लवकर नाहीसा होतो (उदा. लिंबू, पुदीना).

२.मिडल नोट : टॉप नोट गेल्यानंतर हा



वारा फुलांचा सुगंध आणत होता आणि तो सुगंध कोणत्याही दु:खासाठी सर्वोत्तम औषध होता.

सुगंध येतो. हा परफ्युमचा मुख्य सुगंध असतो (उदा. गुलाब, लॅव्हेंडर).

३. बेस नोट : हा सर्वात शेवटी आणि दीर्घकाळ टिकणारा सुगंध असतो. हा गडद आणि समृद्ध असतो (उदा. चंदन, कस्तुरी).

या नोट्सचे संयोजन एक संतुलित आणि अद्वितीय सुगंध तयार करते, जे रसायनशास्त्राचे उत्तम उदाहरण आहे.

सुगंधाचा मानवी भावना आणि मानसिक आरोग्यावर थेट परिणाम होतो.

काही सुगंध (उदा. व्हॅनिला, संत्र्याची फुले) आनंददायी भावना निर्माण करतात आणि तणाव कमी करण्यास मदत करतात. नाकाद्वारे घेतलेला सुगंध थेट मेंदूच्या लिम्बिक सिस्टीमशी ( ) जोडलेला असतो, जिथे भावना आणि स्मृती नियंत्रित केल्या जातात. यामुळे एखादा विशिष्ट सुगंध आपल्याला जुन्या आठवणींमध्ये घेऊन जाऊ शकतो.

योग्य परफ्युमच्या वापरामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो आणि व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक बनते.

परफ्युमचा वापर सामाजिक संदर्भातही महत्त्वाचा आहे. चांगला सुगंध सामाजिक संवादादरम्यान सकारात्मक छाप पाडण्यास मदत करतो. अनेक संस्कृतींमध्ये परफ्युमला विशेष महत्त्व आहे. धार्मिक विधी, सण आणि समारंभांमध्ये सुगंधी द्रव्यांचा वापर अनिवार्य असतो.

परफ्युममध्ये वापरल्या जाणाऱ्या काही कृत्रिम रसायनांमुळे ॲलर्जी किंवा त्वचेची जळजळ होऊ शकते, असे काही संशोधनांतून समोर आले आहे. यामुळे, आंतरराष्ट्रीय स्तरावर परफ्युम उद्योगासाठी सारख्या संस्थांनी सुरक्षितता नियमावली तयार केली आहे. ग्राहक आता क्लीन () आणि पारदर्शक घटक असलेल्या परफ्युम्सना अधिक पसंती देत आहेत.

रसायनशास्त्रज्ञ सतत नवीन, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सुगंधित संयुगे शोधत आहेत. वनस्पती-आधारित (-) आणि टिकाऊ () स्रोतांवर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. परफ्युम हे विज्ञान आणि कलेचे एक अनोखे मिश्रण आहे. रसायनशास्त्राच्या ज्ञानाचा वापर करून तयार केलेले हे सुगंध मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनले आहेत, जे केवळ शारीरिक स्वच्छता किंवा सौंदर्यापलीकडे जाऊन आपल्या भावना आणि सामाजिक जीवनावर सखोल परिणाम करतात.



**प्रा.डॉ.रवींद्र संदीपान शिंदे**
रसायनशास्त्र विभाग
दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर

## सत्ता जिथे मी तिथलाच

आज चहाची चव वेगळी आहे,
कालचा चहा सत्ताधारी होता!

तिकीट नाही दिलं त्यांनी,
म्हणून अचानक आठवलं
हा पक्ष माझा नाहीच होता!

पक्ष म्हणजे हॉटेल समजावं,
जेवण नसलं तर उठून जावं,
तत्त्वं, निष्ठा, विचार वगैरे
हे सगळं बिलात मोजावं!

राजकारणात ताट बदललं,
की पंगतही हळूच बदलावी.
लोकशाहीत जनता बसून पाहते,
आणि आपण खुर्ची सांभाळावी!

जनता चहा पित बसते शांत,
आपण कप बदलत राहावं,
गरम कुठे आहे सत्ता,
तिथेच आपलं तोंड लावावं!

सरकार पडलं तरी म्हणावं,
अरे! माझा पक्ष कुठे पडला?
सत्ता म्हणजे छत्री आहे,
पाऊस जिथे – तिथे उघडला!

नवीन पक्ष सत्तेत आलाय,
गळ्यात नवा गमजा झुलतो,
कालचा शत्रू आज देव झाला,
आणि विवेक कुठे तरी हरवतो!

तत्त्वं नाही बदलत साहेब,
फक्त सत्तेचा पत्ता बदलतो
आणि मग छाती ठोकून सांगतो
सत्ता जिथे मी तिथलाच

उदया बदलली तर पुन्हा नवा.



– राहुल हरिभाऊ इंगळे पाटील
– मो. ९८९०५७७१२८

# मधुमेहाच्या रुग्णांनी अजिबात खाऊ नयेत 'हे' ३ ड्रायफ्रूट्स, वेगाने वाढते रक्तातील साखर







मधुमेह हा असा आजार आहे जो पिढ्यानपिढ्या होऊ शकतो. म्हणजेच आजच्या काळात जर एखाद्या व्यक्तीला मधुमेह असेल तर भविष्यात त्याच्या मुलांनाही मधुमेह होण्याची शक्यता असते. परंतु निरोगी जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींद्वारे मधुमेह नियंत्रित केला जाऊ शकतो. परंतु काही गोष्टी अशा आहेत ज्या निरोगी लोकांसाठी खूप फायदेशीर आहेत परंतु मधुमेहाच्या रुग्णांसाठी हानिकारक ठरू शकतात.

मधुमेहाच्या रुग्णांनी त्यांच्या आहारात कोणताही बदल करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तज्ज्ञ मधुमेहाच्या रुग्णांना ३ ड्रायफ्रूट्सपासून दूर राहण्याचा सल्ला देतात. कारण त्यामुळे शुगर वाढू शकते. जाणून घेऊया ते ३ ड्रायफ्रूट्स कोणते आहेत.

अंजीर

अंजीरमध्ये साखर आणि कॅलरीज जास्त असतात. ज्यामुळे वजन वाढू शकते. अंजीरातील नैसर्गिक साखर मधुमेहींसाठी हानिकारक असू शकते. अंजीर जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. ज्यामुळे विविध आरोग्य समस्या उद्भवू शकतात. जर तुमचे वजन जास्त असेल आणि मधुमेह अनियंत्रित असेल तर जास्त अंजीर खाणे हानिकारक असू शकते. मधुमेहींनी अंजीर टाळावे, परंतु तरीही तुम्हाला ते खाण्याची इच्छा होत असेल तर तुम्ही आठवड्यातून किंवा पंधरा दिवसांतून एकदा १-२ अंजीर भिजवून खाऊ शकता.

खजूर-

खजूरमध्ये नैसर्गिक साखरेसह मोठ्या प्रमाणात कॅलरीज असतात. ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी बिघडू शकते आणि वजन वाढू शकते. मधुमेहाच्या रुग्णांनी रक्तातील साखर वाढण्यास कारणीभूत ठरणारे पदार्थ खाणे टाळावे. म्हणून, खजूर कमी प्रमाणात सेवन करावे. परंतु, त्यातील पोटॅशियमचे प्रमाण उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करू शकते. तुम्ही फक्त एक किंवा दोन खजूरचे सेवन करावे.

मनुके

मधुमेहाच्या रुग्णांसाठी जास्त मनुके खाणे हानिकारक ठरू शकते. काही मधुमेहींना गोड पदार्थांची इच्छा असताना ते जास्त खातात, ज्यामुळे त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. मनुक्यामध्ये साखर जास्त असते, जी मधुमेहाच्या रुग्णांसाठी चांगली नसते. शिवाय, मनुक्यामधील नैसर्गिक साखर वजन वाढण्यास कारणीभूत ठरू शकते. जर तुमचे वजन जास्त असेल किंवा मधुमेह अनियंत्रित असेल तर मनुके खाणे हानिकारक ठरू शकते. मधुमेही एक किंवा दोन मनुके खाऊ शकतात. परंतु त्यापेक्षा जास्त सेवन केल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते.

# टक्कल पडण्यापासून रोखते मोहरीचे तेल, 'या' पदार्थांसोबत मिसळून लावल्यास वाढतात केस



आजकाल प्रत्येकालाच लांब, जाड आणि मजबूत केस हवे आहेत. केस वाढवण्यासाठी आणि केस गळती रोखण्यासाठी लोक महागडे प्रॉडक्टस वापरतात. पण काही घरगुती उपाय देखील निरोगी आणि मजबूत केसांसाठी खूप फायदेशीर मानले जातात, ज्यात मोहरीच्या तेलाचासुद्धा समावेश आहे.

मोहरीच्या तेलात ओमेगा-३ फॅटी ॲसिड, व्हिटॅमिन ई, अँटीऑक्सिडंट्स, प्रथिने आणि इतर अनेक पोषक घटक असतात जे टाळूचे पोषण करण्यास आणि केसांच्या वाढीस चालना देण्यास मदत करतात. पण तुम्हाला माहित आहे का की, मोहरीचे तेल इतर घटकांसह मिसळल्याने केसांशी संबंधित अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. आज आपण जाणून घेऊया की मजबूत, जाड आणि लांब केस मिळविण्यासाठी मोहरीच्या तेलात काय मिसळून लावले पाहिजे..

**कढीपत्ता आणि मोहरीचे तेल–**

आयुर्वेदानुसार कढीपत्ता केसांसाठी अत्यंत फायदेशीर मानला जातो. त्यात व्हिटॅमिन बी भरपूर प्रमाणात असते. जे केस लवकर पांढरे होणे टाळण्यास मदत करते आणि केसांना नैसर्गिकरित्या काळे ठेवते. कढीपत्ता मोहरीच्या तेलात मिसळून लावल्याने केस पांढरे होणे टाळता येते, केसांना मुळांपासून पोषण मिळते आणि केसांची वाढ जलद होते. मोहरीच्या तेलात कढीपत्ताची पाने चांगली उकळा. पाने काळी पडली की, गॅस बंद करा, तेल थंड होऊ द्या आणि आठवड्यातून दोनदा केसांना लावा.

**मोहरीचे तेल आणि कांद्याचा रस–**

कांद्यामध्ये सल्फरचे प्रमाण जास्त असते, जे कोलेजन उत्पादन वाढवते आणि केसांची वाढ करते. कांदा आणि मोहरीचे तेल केसांना लावल्याने केसांची मुळे मजबूत होतात, टक्कल पडण्यापासून बचाव होतो आणि केस जाड आणि मजबूत होतात.

**मेथीदाणे मोहरीचे तेल–**

मेथीदाण्यांमध्ये प्रथिने आणि निकोटिनिक ॲसिड भरपूर प्रमाणात असते. जे केसांची मुळे मजबूत करण्यास आणि कोंडा दूर करण्यास मदत करते. ते मोहरीच्या तेलात मिसळल्याने केसांची मुळे मजबूत होतात, केस गळणे कमी होते आणि नवीन केसांची वाढ होण्यास मदत होते. हे तेल तयार करण्यासाठी, २ चमचे मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजवा. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याची पेस्ट बनवा. ते मोहरीच्या तेलात मिसळा, थोडे गरम करा आणि थंड झाल्यावर केसांना लावा.

## पावसाळ्यातील 'इम्युनिटी बूस्टर' आहेत तुमच्याच किचनमध्ये! रोगप्रतिकारशक्ती वाढवतात 'हे' मसाले, आजारांना ठेवतात दूर

जगभरात खवय्यांची काही कमी नाही, विविध देशात विविध खाद्यसंस्कृती आहे. अशात भारतही आपल्या खाद्यपदार्थासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. इथल्या पदार्थामध्ये अनेक प्रकारचे मसाले वापरले जातात, जे केवळ चवच वाढवत नाहीत तर तुमच्या आरोग्यालाही अनेक फायदे देतात. सध्या मान्सूनचं आगमन देशात झाल्यामुळे आल्हाददायक वातावरणासोबतच विविध आजारांनी देखील डोकं वर काढलंय, या आजारांपासून कसा बचाव करण्यासाठी आपण विविध उपाय करतो. पण तुम्हाला माहित आहे का, या आजारांपासून बचाव करणारे तसेच रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे 'इम्युनिटी बूस्टर' तुमच्याच किचनमध्ये आहेत. हो हे खरंय.. असे काही मसाले आहेत जे पावसाळ्यात रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. जाणून घ्या..केवळ चव वाढवण्यासाठी नाही, तर निरोगी बनवण्यातही मदत करतात

जवळजवळ प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात विविध प्रकारचे मसाले आढळतात, जे त्यांच्या चव आणि उत्कृष्ट सुगंधामुळे मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. मात्र, हे मसाले केवळ चव वाढवण्यासाठी मर्यादित नसून तुम्हाला निरोगी बनवण्यातही मदत करतात. पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते, त्यामुळे अनेक प्रकारचे रोग आणि संसर्ग आपल्याला होतात. अशात तुमची प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी आहारात आवश्यक बदल करणे आवश्यक आहे. पावसाळ्यात तुम्ही तुमच्या आहारात काही मसाल्यांचा समावेश करून आजार आणि संसर्गापासून स्वत:चा बचाव करू शकता.

बदलत्या हवामानामुळे रोगप्रतिकारक शक्ती होते कमकुवत

महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात पावसासह मान्सूनचे आगमन झाले आहे. बदलत्या हवामानामुळे रोगप्रतिकारक शक्ती अनेकदा कमकुवत होते, ज्यामुळे अनेक रोग आणि संसर्ग लोकांना आपले बळी बनवतात. अशा परिस्थितीत आहारात काही मसाल्यांचा समावेश करून तुम्ही पावसाळ्यात स्वत:ला निरोगी बनवू शकता. जाणून घेऊया पावसाळ्यात आहारात कोणत्या मसाल्यांचा समावेश करावा–

हळद

जवळजवळ प्रत्येक डिशमध्ये वापरली जाणारी, हळद त्याच्या शक्तिशाली दाहक-विरोधी आणि सूक्ष्मजीवविरोधी गुणधर्मासाठी ओळखली जाते. या गुणांमुळे तो पावसाळ्यासाठी आवश्यक मसाला बनतो. हे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते, ज्यामुळे पावसाळ्यात संक्रमण टाळता येते.

**लवंग**

युजेनॉलने समृद्ध, लवंग हा अँटीव्हायरल आणि अँटी-मायक्रोबियल गुणधर्म असलेला एक लोकप्रिय मसाला आहे. यातील गुणवत्तेमुळे हा मसाला हंगामी रोगांपासून संरक्षण करण्यासाठी एक आदर्श मसाला बनतो. तुम्ही लवंगांना विविध मार्गांनी तुमच्या आहाराचा भाग बनवू शकता, जसे की त्यांना अन्नात घालून किंवा स्वादिष्ट पदार्थांमध्ये जोडून. पचन सुधारण्यासोबतच लवंग श्वसनाच्या समस्यांपासून आराम देते आणि पावसाळ्यात तुमची रोगप्रतिकारशक्तीही वाढवते.

**जिरे**

जिरे हा पावसाळ्यासाठी महत्त्वाचा आणि आवश्यक असलेला मसाला आहे, कारण त्याचे असंख्य आरोग्य फायदे आहेत. हे सामान्यत: पचन समस्यांपासून आराम मिळविण्यासाठी वापरले जाते. याशिवाय, पावसाळ्यात उद्भवणाऱ्या इतर समस्यांपासून संरक्षण करण्यातही मदत होते. जिऱ्याचा वापर तुम्ही सूप, डाळ, चहा आणि भाज्यांमध्ये करू शकता.

**काळी मिरी**

काळी मिरी सामान्यत: त्याच्या उष्ण गुणधर्मासाठी ओळखली जाते. याशिवाय, ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास आणि पाचन समस्या टाळण्यास देखील मदत करते. त्यामुळेच पावसाळ्यात होणारे आजार आणि संसर्गापासून बचाव करण्यासाठी हे उपयुक्त ठरते. तुम्ही ते सूप, स्टू आणि चहा किंवा इतर पदार्थांमध्ये घालून तुमच्या आहारात समाविष्ट करू शकता.

# भीमा कोरेगाव शौर्य दिन

## सामाजिक समतेच्या संघर्षाची प्रेरणागाथा



भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना केवळ लष्करी विजय किंवा पराभव म्हणून मर्यादित राहत नाहीत, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या, आत्मसन्मानाच्या आणि समानतेच्या संघर्षाचे प्रतीक बनतात. १ जानेवारी रोजी साजरा होणारा ङ्गभीमा कोरेगाव शौर्यदिनफ ही अशीच एक ऐतिहासिक घटना आहे. १८१८ साली भीमा नदीच्या काठावर घडलेली भीमा कोरेगावची लढाई ही केवळ इंग्रज आणि पेशवाई यांच्यातील संघर्ष नव्हता, तर तो तत्कालीन सामाजिक विषमतेविरुद्ध उभा राहिलेल्या शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या आत्मसन्मानाचा लढा होता. म्हणूनच हा दिवस केवळ इतिहासातील एक पान नसून, आजही सामाजिक समतेच्या संघर्षाला दिशा देणारा प्रेरणास्तंभ आहे.

पेशवाईच्या काळात भारतीय समाजावर कडव्या जातिव्यवस्थेचे जाचक ओझे होते. विशेषतः महार, मांग, चांभार यांसारख्या दलित समाजघटकांवर अमानवी निर्बंध लादले गेले होते. सार्वजनिक विहिरी, मंदिरे, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानवी हक्क यांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले होते. अशा स्थितीत पेशवाईविरोधात उभे ठाकलेले महार समाजातील सैनिक इंग्रज सैन्यात सहभागी झाले आणि त्यांनी भीमा कोरेगावच्या रणांगणावर पराक्रम गाजवला. संख्येने कमी असूनही त्यांनी पेशव्यांच्या बलाढ्य सैन्याला रोखले. या विजयाने दलित समाजाला केवळ लष्करी यश मिळाले नाही, तर त्यांनी सामाजिक अपमानाच्या इतिहासाला छेद दिला.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भीमा कोरेगावची लढाई ही सत्ता, जात आणि प्रतिष्ठा यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. तत्कालीन सामाजिक रचना ही सत्ताधारी उच्चवर्णीयांच्या बाजूने झुकलेली होती. पेशवाई ही केवळ राजकीय सत्ता नव्हती, तर ती धार्मिक-सामाजिक वर्चस्वाचीही प्रतिनिधी होती. अशा व्यवस्थेविरुद्ध उभा राहणे म्हणजे केवळ युद्ध जिंकणे नव्हे, तर सामाजिक मानसिकतेला आव्हान देणे होते. महार सैनिकांनी हे आव्हान स्वीकारले आणि इतिहासात आपले नाव कोरले.

या घटनेचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला मानवंदना दिली. त्या दिवसापासून भीमा कोरेगाव शौर्यदिनाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. डॉ. आंबेडकरांसाठी हा विजय ब्रिटिशांच्या बाजूने मिळालेला लष्करी यश नव्हता, तर तो अस्पृश्यतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या आत्मसन्मानाचा विजय होता. त्यांनी या घटनेचा उपयोग दलित समाजात स्वाभिमान, संघटन आणि संघर्षाची चेतना निर्माण करण्यासाठी केला.

भीमा कोरेगाव शौर्यदिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व समजून घेताना स्मृती-राजकारण (झेश्रळ-ींळली ेष चशोीू) या संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणता इतिहास सांगितला जातो, कोणता दडपला जातो आणि कोणाच्या स्मृती जपल्या जातात, यावर समाजाची दिशा ठरते. पारंपरिक इतिहास लेखनात दलित, स्त्रिया आणि वंचित समाजघटकांचे योगदान दुर्लक्षित राहिले. भीमा कोरेगावची आठवण ही या दुर्लक्षित इतिहासाला केंद्रस्थानी आणणारी आहे. म्हणूनच हा दिवस केवळ भूतकाळाची आठवण नाही, तर इतिहास पुन्हा मांडण्याचा सामाजिक प्रयत्न आहे.

आज भीमा कोरेगाव शौर्यदिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. देशभरातून लाखो लोक या ठिकाणी एकत्र येतात. ही केवळ श्रद्धांजली नसून, ती एक सामाजिक जाणीव आहे. या एकत्र येण्यामागे समानतेची आकांक्षा, संविधानिक मूल्यांची निष्ठा आणि अन्यायाविरुद्धचा आवाज दडलेला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा मेळावा ङ्गसामूहिक ओळखफ (उेश्रश्रशलींळींश खवशपींळीू) निर्माण करतो. जात, वर्ग, प्रदेश यापलीकडे जाऊन लोक एकमेकांशी जोडले जातात.

मात्र, भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या संदर्भात उद्भवणारे वाद आणि संघर्षही समाजशास्त्रीय विश्लेषणाची मागणी करतात. काही घटकांना हा दिवस अस्वस्थ करतो, कारण तो पारंपरिक सत्तासंरचनांना प्रश्न विचारतो. इतिहासाचे वेगवेगळे अर्थ लावले जातात आणि स्मृतींवर अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष होतो. या पार्श्वभूमीवर, समाजात संवाद, समज आणि सहअस्तित्वाची गरज अधोरेखित होते. भीमा कोरेगावची प्रेरणा संघर्षाची असली, तरी तो संघर्ष मानवी मूल्यांसाठी आहे, द्वेषासाठी नव्हे.

आजच्या काळात, जेव्हा संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि लोकशाहीवर विविध प्रकारचे आव्हाने येत आहेत, तेव्हा भीमा कोरेगाव शौर्यदिन अधिकच महत्त्वाचा ठरतो. हा दिवस आपल्याला सांगतो की अधिकार सहज मिळत नाहीत; त्यासाठी संघटित संघर्ष करावा लागतो. दलित समाजाचा हा इतिहास केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण भारतीय लोकशाहीच्या प्रवासाचा भाग आहे.

शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत आजही असमानता दिसून येते. भीमा कोरेगावची आठवण ही या असमानतेविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देते. समाजशास्त्रीय दृष्टीने, हा दिवस सामाजिक गतिशीलतेचा (डेलळरश्र चेलळश्रळींू) संदेश देतो. इतिहासात दडपल्या गेलेल्या समाजघटकांनी शिक्षण, चळवळ आणि संविधानाच्या माध्यमातून आपले स्थान बदलू शकते, हे भीमा कोरेगावचे प्रतीक आहे.

म्हणूनच, भीमा कोरेगाव शौर्यदिन साजरा करताना केवळ भूतकाळाचा गौरव न करता वर्तमान आणि भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. जातीय द्वेष, सामाजिक बहिष्कार आणि असमानता यांना नकार देत, समतेवर आधारित समाज उभारण्याचा संकल्प करण्याची ही वेळ आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक मूल्यांच्या चौकटीत राहून, लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची प्रेरणा भीमा कोरेगाव आपल्याला देते.

खेरीस असे म्हणता येईल की, भीमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ एका लढाईचा स्मृतिदिन नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या दीर्घ संघर्षाचा प्रतीकात्मक उत्सव आहे. हा दिवस आपल्याला इतिहासातून शिकवतो की, अन्याय कितीही खोल रुजलेला असला, तरी संघटित इच्छाशक्ती, आत्मसन्मान आणि समानतेची जाणीव त्याला आव्हान देऊ शकते. म्हणूनच १ जानेवारी हा दिवस शौर्याचा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या अखंड प्रवासाचा साक्षीदार ठरतो.

डॉ. राजेंद्र बगाटे






# उकळता चहा किंवा कॉफी पिण्याचे दुष्परिणाम जाणून घ्या

चहा आणि कॉफीची चव सर्वांनाच आवडते, परंतु तुम्हाला माहित आहे का की उकळता गरम चहा आणि कॉफी पिण्याची सवय हाडांसाठी खूप धोकादायक असू शकते?

दृष्टी कमकुवत झाली, या पदार्थांचा आहारात समावेश करा

उकळता चहा आणि कॉफी पिण्याचे तोटे:

**१. हाडे कमकुवत होणे:** उकळता चहा आणि कॉफीमध्ये असलेले कॅल्शियम शोषून घेण्याची क्षमता कमी होते. यामुळे कॅल्शियमची कमतरता होते, ज्यामुळे हाडे कमकुवत होतात आणि फ्रॅक्चरचा धोका वाढतो.

बीड जिल्ह्यात नववीच्या एका विद्यार्थिनीने घरी गळफास घेऊन आत्महत्या केली

**२. ऑस्टिओपोरोसिसचा धोका:** उकळता चहा आणि कॉफीमध्ये असलेले टॅनिन नावाचे घटक कॅल्शियमचे शोषण रोखतात. यामुळे ऑस्टियोपोरोसिस नावाच्या आजाराचा धोका वाढतो, ज्यामध्ये हाडे खूप कमकुवत होतात.

**३. दातांचे नुकसान:** उकळता चहा आणि कॉफीमध्ये असलेल्या ऍसिडमुळे दातांचे इनॅमल कमकुवत होते, ज्यामुळे दातात कीड लागणे आणि दात पिवळे होऊ शकतात.

**४. पोटात जळजळ:** चहा आणि कॉफी उकळता प्यायल्याने पोटात जळजळ, ऍसिडिटी आणि अपचन होऊ शकते.

५. झोपेचा त्रास होणे : चहा आणि कॉफीमध्ये कॅफिन असते ज्यामुळे झोपेचा त्रास होतो. चहा किंवा कॉफी उकळता प्यायल्याने हा त्रास वाढू शकतो.

**६. रक्तदाब वाढणे:** उकळता चहा आणि कॉफीमधील कॅफिनमुळे रक्तदाब वाढू शकतो, जो हृदयरोगांसाठी धोकादायक ठरू शकतो.

हे पदार्थ पुन्हा पुन्हा मायक्रोवेव्ह मध्ये गरम करू नये

काय करावे ?

१. थंड झाल्यावर चहा आणि कॉफी प्या: चहा आणि कॉफी थंड झाल्यावर उकळून प्या. यामुळे हाडांना होणारे नुकसान कमी करता येते.

**२. दूध वापरा:** चहा आणि कॉफीमध्ये दूध मिसळल्याने कॅल्शियमचे शोषण वाढते.

**३. कॅफिनचे सेवन कमी करा:** कॅफीनचे सेवन कमी केल्याने झोपेचा त्रास, रक्तदाब वाढणे आणि इतर समस्या टाळता येतात.

**४. कॅल्शियमयुक्त आहार घ्या:** दूध, दही, चीज, हिरव्या पालेभाज्या, बदाम, सोयाबीन इत्यादी कॅल्शियमयुक्त आहार घ्या.

**५. डॉक्टरांचा सल्ला घ्या:** तुम्हाला हाडांची कोणतीही समस्या असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

उकळता चहा आणि कॉफी पिण्याची सवय हाडांसाठी खूप घातक ठरू शकते. त्यामुळे चहा-कॉफी थंड प्या आणि कॅल्शियमयुक्त आहार घ्या. निरोगी रहा, आनंदी रहा!

रिकाम्या पोटी चहा पिण्याचे तोटे जाणून घ्या

**अस्वीकरण :** या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## जांभळाचे सरबत डायबिटीजसाठी उपयोगी औषध — डॉक्टर टीप्स

### जांभळाचे सरबत

साहित्य - पाव किलो जांभळे, एक ग्लास साखर.

कृती - जांभळे बुडतील इतक्या पाण्यात कुकरमध्ये उकडून घ्या . पाण्यासह जांभळे कुस्करून बिया काढा. मिक्सर मध्ये फिरवून (हवे असल्यास गाळून ) घ्या. एक ग्लास साखरेचा दोन तरी पाक करून घ्या. थंड झाल्यावर पाक आणि जांभूळ गर मिसळा. एक ग्लास सरबत बनवताना पाऊण ग्लास मिश्रण आणि पाव ग्लास पाणी घाला. आवडत असेल तर साखर घाला. ढवळा. हे जांभूळ सरबत अगदी नैसर्गिक असल्यामुळे चवदार लागते. तुम्ही आईसक्रीम मध्येही घालू शकता.



जांभूळ हे उत्तम फळ आहे सुश्रुतांच्या मते जांभूळ पित्त, रक्तदहनाशक, शरीराची कांती सुंदर बनवणारे आहे. जांभूळ खाल्ल्याने रक्त लाल बनते. जांभळे मीठ टाकून खाणे हितावह आहे जांभळा मध्ये लोह फॉस्फरस, फॉलिक एसिड असते. जांभळे किडकी खाऊ नयेत. जांभूळ पिकण्यासाठी ग्रीष्माचे ऊन आणि वर्षाऋतूतील पावसाचा शिडकावा लागतो. बुद्ध लोक या झाडाला पवित्र मानतात.

## विनोद




**मुन्ना : तुला जपानी बोलता येते?**

**पप्पू : हो.**

**मुन्ना : बोल बरं.**

**पप्पू : जपानी.**

## संदेश

Santa Banta Hindi Jokes
Banta: Santa, itna udhaas kyu baita hai?
Santa: yaar betting mein maine 2000 gavaa diyaa :-(
Banta: kaise?
Santa: India pe 1000 rupaiye ka bet lagaaya tha aur India ne match haar gaya
Banta: lekin 2000 kaise?
Santa: aaj us match ka high-lights daale. India pe ummeed rakh ke phir 1000 dala tha.

## सुविचार

जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेल तर ते भ्रमिष्टपणाने वागेल. **– स्पॅनिश म्हण**



**संस्कृत सुभाषित**

**अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन्**
**प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।**
**(शांतीपर्व, अध्याय १०३, श्लोक ९, महाभारत)**

**अर्थ** –शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचणारी गोष्ट करू नये.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. जमिनीवरचे प्राणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
१०. प्रचंड, तीव्र
११. नजरेचा तीर
१६. गालबोट
१७. उडाणटप्पूंची चैन
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृतिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र
३८. वंचित
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाशी गुणोत्तर
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. लेंगा
५७. परिस्थिती
५८. अंगठी घालण्याचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. शत्रूला गाठण्याची चिंचोळी जागा
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. बघू नये अशी स्वयंपाकाची जागा!
७९. जयाचा नामघोष

### उभे शब्द

१. 'सिने में ---, आंखो ने तुफान सा क्यों है, इस शहर में हर शख्स परेशानसा क्यों है'
२. पक्के वचन
३. सभ्य माणसांचे 'व्यसन'!
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. आमंत्रक, कुटुंबोप्रमुख
७. संकटातून निभावणे
८. जवळचा घरातील शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. बारीक वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कण्यातील हाड
१९. पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट, खल
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. मौल्यवान खडा (हिंदी)
३१. मालवणी गोडी शेव
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. शाहरुखचे फिल्मी नाव
४०. रम्य, मनोहर
४१. तेंडुलकरांचे वादग्रस्त नाटक 'घाशीराम ----'
४२. पैजेत पीळ देण्याची-उतरवण्याची
४४. जननी
४५. शाळकरी मुलांना, नोकरदारांना हवा-हवासा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. गायींचे पिल्लू
५३. लक्ष्मीवल्लभ
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. इंग्रेजी वर्णमालेतील शेवटून दुसरे अक्षर

### आडवे उत्तर

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजमा ५७.हालहलाव ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

### उभे उत्तर

१.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### सर्फराज खानचे वादळ! फक्त इतक्या चेंडूत २३ चौकार-षटकारांसह केली दीडशतकी खेळी

मुंबई-सर्फराझ खानने वादळी खेळीसह वर्षाचा शेवट अगदी गोड केला आहे. २०२५ च्या अखेरच्या दिवशी विजय हजारे ट्रॉफीमध्ये सर्फराझ खानने एक दमदार शतक झळकावले. मुंबई आणि गोवा यांच्यातील सामना जयपूरमध्ये खेळला जात होता, या सामन्यात सर्फराझ खानने ५९ चेंडूत शतक करत सर्वांचे लक्ष वेधले. या खेळीदरम्यान त्याने अर्जुन तेंडुलकरची चांगलीच धुलाई केली. दीडशतकी खेळीसह मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ४४४ धावा केल्या आहेत.गोवा विरुद्ध सामन्यात सर्फराझ खान व त्याचा भाऊ मुशीर खान यांनी ९३ धावांची भागीदारी केली. मुशीर खान ६० धावा करत माघारी परतला. यानंतर सर्फराझ खानने डावाची जबाबदारी घेत ७५ चेंडूत १५७ धावा केल्या. २०९ पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने धुव्वाधार फटकेबाजी करताना त्याने १४ षटकार आणि ९ चौकारांसह ही खेळी साकारली. त्याने फक्त ५७ चेंडूत शतक पूर्ण केले. सर्फराझ खानने शतक पूर्ण करण्यासाठी आठ षटकार मारले.विजय हजारे ट्रॉफीच्या चालू हंगामातील सर्फराझ खानचं हे पहिलं शतक आहे. या हंगामात त्याची मागील सर्वोत्तम धावसंख्या ५५ होती, जी त्याने उत्तराखंडविरुद्ध सामन्यात केली होती. लिस्ट ए क्रिकेटमधील सर्फराझ खानचं हे तिसरं शतक आहे. सर्फराझ खानने गोव्याच्या सर्वच गोलंदाजांविरूद्ध हल्लाबोल केला. पण यादरम्यान त्याने अर्जुन तेंडुलकरच्या गोलंदाजीविरूद्धही शानदार फटकेबाजी केली. अर्जुन तेंडुलकरने ८ षटकांत ७८ धावा दिल्या आणि त्याला एकही विकेट मिळाली नाही. मुंबई संघाने ५० षटकांत ८ बाद ४४४ धावांची विक्रमी धावसंख्या उभारली. यशस्वी जैस्वालने ४६ धावा करत संघाला चांगली सुरूवात करून देण्याचा प्रयत्न केला. यानंतर मुशीर खाने ६० धावांची व सर्फराझ खानने १७५ धावांची खेळी केली. याशिवाय कर्णधार शार्दुल ठाकूरने २७ धावांचं योगदान दिलं. तर यष्टीरक्षक हार्दिक तामोरे याने २८ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह ५३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

### अफगाणिस्तानने टी-२० विश्वचषकासाठी संघ केला जाहीर, ४० वर्षीय खेळाडूचाही समावेश;

दिल्ली-टी-२० विश्वचषक २०२६ येत्या ७ फेब्रुवारीपासून खेळवला जाणार आहे. या स्पर्धेचे यजमानपद भारत आणि श्रीलंका या संघांकडे आहे. स्पर्धेची तारीख जवळ येत असल्याने सहभागी देश आपल्या संघांची घोषणा करत आहेत. यादरम्यान आता अफगाणिस्तानने आपला संघ जाहीर केला आहे. अफगाणिस्तानने संघात ४० वर्षीय खेळाडूला संधी दिली आहे.अफगाणिस्तानने रशीद खानला संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त केलं आहे. अष्टपैलू गुलबदीन नायब आणि वेगवान गोलंदाज नवीन-उल-हक हे देखील खांद्याच्या दुखापतीतून सावरत एक वर्षानंतर संघात परतले आहेत. नवीनने डिसेंबर २०२४ मध्ये हरारे येथे झिम्बाब्वेविरुद्ध शेवटचा टी-२० सामना खेळला होता. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने टी-२० विश्वचषक तसेच वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी आपला संघ जाहीर केला आहे. विश्वचषकात सहभागी झालेला संघच वेस्ट इंडिजविरूद्ध मालिकेत खेळताना दिसणार आहे. टी-२० विश्वचषकापूर्वी १९ ते २२ जानेवारी दरम्यान युएईमध्ये अफगाण संघ वेस्ट इंडिजविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळेल.शाहिद उल्लाह कमाल आणि यष्टिरक्षक-फलंदाज मोहम्मद इशाक यांनी संघात आपले स्थान कायम ठेवले आहे. युवा वेगवान गोलंदाज अब्दुल्ला अहमदझाईचाही संघात समावेश करण्यात आला आहे. १५ सदस्यीय संघात फजल हक फारुकीचाही समावेश करण्यात आला आहे. मुजीब उर रहमान हा संघातील लक्षवेधी खेळाडू आहे. याशिवाय संघाने दिग्गज अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नबीला देखील संधी दिली आहे. नबी आता ४० वर्षांचा आहे.एएम गझनफरला एजाज अहमदझाई आणि तरुण वेगवान गोलंदाज झिया उर रहमान शरीफी यांच्यासह राखीव गटात स्थान देण्यात आले आहे. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये अफगाणिस्तानला न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, युएई आणि कॅनडासह ड गटात स्थान देण्यात आलं आहे. अफगाणिस्तान संघ ८ फेब्रुवारीला चेन्नईमध्ये न्यूझीलंडविरुद्ध पहिला सामना खेळेल.

अफगाणिस्तानचा टी-२० विश्वचषक २०२६ साठी संपूर्ण संघरशीद खान (कर्णधार), इब्राहिम झादरान (उपकर्णधार), रहमानउल्ला गुरबाज (यष्टीरक्षक), मोहम्मद इशाक (यष्टीरक्षक), सेदीकुल्लाह अटल, दरविश रसूली, शाहिदुल्ला कमाल, अजमतुल्ला उमरझाई, गुलबदिन नायब, मोहम्मद नबी, नूर अहमद, मुजीब उर रहमान, नवीन उल हक, फजल हक फारुकी आणि अब्दुल्ला अहमदझई. राखीव खेळाडू: एएम गझनफर, इजाज अहमदझई आणि झिया

## महाराष्ट्राचा तारणहार! ऋतुराज गायकवाडचं विजय हजारे ट्रॉफीत शानदार शतक



**नवी दिल्ली:** महाराष्ट्र संघाचा तारणहार ऋतुराज गायकवाडने संघाला गरज असताना उत्कृष्ट कामगिरी करत शतक झळकावलं आहे.विजय हजारे ट्रॉफीच्या गट टप्प्यात महाराष्ट्र आणि उत्तराखंड यांच्यात सामना खेळवला जात आहे. या सामन्यात महाराष्ट्र संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने संघासाठ शतकी खेळी केली. या खेळीसह तो संघासाठी तारणहार ठरला. ऋतुराज गायकवाड यंदा उत्कृष्ट फॉर्मात असून त्याने संधी मिळालेल्या सर्व सामन्यांमध्ये वादळी खेळी केल्या.

ऋतुराज गायकवाडने १०५ चेंडूत १० चौकार व एका षटकारासह १०१ धाव करत संघाचा डाव सावरला. महाराष्ट्र संघाची सुरूवात खूप खराब झाली. संघाने ५० धावांत ३ विकेट्स गमावल्यानंतर ऋतुराज गायकवाड फलंदाजीला उतरला आणि त्याने शतक झळकावत संघाला २०० धावांच्या पलीकडे नेलं.

उत्तराखंड संघाने नाणेफेक जिंकत महाराष्ट्र संघाला फलंदाजीसाठी पाचारण केलं. पण संघाची सुरूवात फार खराब झाली आणि ५० धावांवर ३ विकेट्स गमावले. यानंतर ऋतुराज गायकवाड फलंदाजीला उतरला आणि त्याने राहुल त्रिपाठी व सत्यजीत बचाव याच्या साथीने संघाला मजबूत स्थिती नेलं. राहुल व ऋतुराजने अर्धशतकी तर ऋतुराज-सत्यजीतने शतकी भागीदारी करत महाराष्ट्र संघ ३०० धावांच्या पलीकडे गेला. ऋतुराज गायकवाजने ११३ चेंडूत १२ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने १२४ धावांची खेळी केली. त्याशिवाय राहुल त्रिपाठीने ३३ धावा, सत्यजीत बचावने ५६ धावांची तर रामकृष्ण घोष याने ४७ धावांची खेळी केली. यासह महाराष्ट्रने ५० षटकांत ७ विकेट्स गावत ३३१ धावा केल्या.

## ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू डेमियन मार्टिनची प्रकृती गंभीर

**ब्रिस्बेन :** ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू डेमियन मार्टिनची प्रकृती सध्या गंभीर असल्याचे वृत्त ऑस्ट्रेलियन माध्यमांनी दिले आहे. मेंदूज्वर (मेनिन्जायटिस) झाल्याने मार्टिनला गोल्ड कोस्ट येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

ऑस्ट्रेलियातील वृत्तपत्रांच्या माहितीनुसार, ५४ वर्षीय मार्टिनला मेंदूज्वर झाल्याने डॉक्टरांनी त्याला कृत्रिम कोमामध्ये ठेवले आहे. ङ्गमार्टिनची प्रकृती अजूनही गंभीर असून गोल्ड कोस्ट विद्यापीठ हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर सर्वोत्तम उपचार सुरू आहेत,ङ्ग असे गोल्ड कोस्ट हेल्थच्या प्रवक्त्यांनी सांगितले.

ऑस्ट्रेलिया संघातील माजी सहकारी डॅरेन लिहमन, ॲडम ग्रिलख्रिस्ट यांनी समाजमाध्यमांवर मार्टिनसाठी विशेष संदेश लिहिला. ङ्गडेमियनसाठी भरपूर प्रेम आणि प्रार्थना. धीराने लढत राहा,ङ्ग अशी भावना लिहमन यांनी व्यक्त केली. मार्टिन सहजसुंदर फलंदाजी आणि नेत्रदीपक फटक्यांसाठी ओळखला जायचा. त्याने ६७ कसोटी सामन्यांत ४६.३७ च्या



**ऑस्ट्रेलियातील वृत्तपत्रांच्या माहितीनुसार, ५४ वर्षीय मार्टिनला मेंदूज्वर झाल्याने डॉक्टरांनी त्याला कृत्रिम कोमामध्ये ठेवले आहे.**

सरासरीने धावा केल्या. यात १३ शतकांचा समावेश होता.२००६-०७ च्या ॲशेस मालिकेत त्याने अखेरची कसोटी खेळली. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याने २०८ सामने खेळून ४०.८० च्या सरासरीने धावा केल्या. १९९९ आणि २००३ विश्वचषक विजेत्या ऑस्ट्रेलियन संघाचा तो सदस्य होता. २००३ च्या अंतिम सामन्यात भारताविरुद्ध त्याने नाबाद ८८ धावांची खेळी केली होती.

## जागतिक अतिजलद अजिंक्यपद स्पर्धेतही कार्लसनचीच बाजी

दोहा-भारताचा ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीला निर्णायक टप्प्यावर सर्वोत्तम खेळ करण्यात पुन्हा अपयश आले. त्यामुळे जागतिक जलद स्पर्धेपाठोपाठ अतिजलद स्पर्धेतही त्याला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

विश्वातील सर्वोत्तम बुद्धिबळपटू अशी ख्याती असलेल्या मॅग्नस कार्लसनने चमकदार कामगिरी करताना अतिजलद स्पर्धेतही जेतेपद पटकावले. त्याने अंतिम लढतीत उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचा २.५-१.५ असा पराभव केला.

अतिजलद स्पर्धेच्या साखळी फेरीत एरिगेसीने दर्जेदार खेळ केला होता. खुल्या विभागात १९ फेऱ्यांअंती त्याच्या खात्यावर सर्वाधिक १५ गुण होते. एरिगेसीसह अमेरिकेचा फॅबियानो कारुआना (१४ गुण), कार्लसन (१३.५) आणि अब्दुसत्तोरोव (१३) यांनीही उपांत्य फेरी गाठली.

या फेरीत एरिगेसीची जागतिक जलद स्पर्धेतील माजी विजेत्या अब्दुसत्तोरोवशी गाठ पडली. एरिगेसीने साखळी फेरीत कार्लसन आणि अब्दुसत्तोरोव या दोघांना नमवले होते. त्यामुळे जेतेपदासाठी त्याला प्रबळ दावेदार मानले जात होते. मात्र, त्याला कामगिरीत सातत्य राखता आले नाही. उपांत्य फेरीत पहिल्या दोनही डावांत एरिगेसीला अब्दुसत्तोरोव याच्याकडून हार पत्करावी लागली. त्यामुळे आगेकूच करण्यासाठी अब्दुसत्तोरोवला उर्वरित दोन डावांत मिळून केवळ अर्ध्या गुणाची आवश्यकता होती.

अब्दुसत्तोरोवने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना तिसरा डाव ३३ चालींत बरोबरीत सोडवला आणि एकूण लढत २.५-०.५ अशी जिंकत अंतिम फेरी गाठली.अन्य उपांत्य लढतीत कार्लसनने कारुआनाचा ३-१ असा पराभव केला. महिला विभागात, भारताच्या आघाडीच्या ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख यांनी निराशाजनक कामगिरी केली. १५ फेऱ्यांअंती दिव्या २२व्या, तर हम्पी २३व्या स्थानी राहिली.



मोरोक्कोच्या रबाट येथे आफ्रिका कप ऑफ नेशन्स फुटबॉल सामन्यात भाग घेताना मोरोक्को आणि झांबियाचे खेळाडू.

## विराटसाठी २८ हजार धावांचा टप्पा लवकर

मुंबई -भारतीय क्रिकेटचा मकिंगफ विराट कोहली पुन्हा एकदा जागतिक क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण करण्यासाठी सज्ज झाला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८,००० धावांचा हिमालयीन टप्पा गाठण्यापासून विराट आता अवघ्या २५ धावा दूर आहे. हा टप्पा ओलांडताच विराट कोहली अशा एका विशेष क्लबमध्ये सामील होईल, जिथे आतापर्यंत जगातील केवळ दोनच फलंदाजांना पोहोचता आले आहे. विराट कोहलीने जरी कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून संन्यास घेतला असला, तरी तो वनडे क्रिकेटमध्ये बॅटने चांगलीच फटकेबाजी करत आहे. नुकत्याच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत त्याने एकट्याने संघाची फलंदाजी सांभाळली. त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेत ३ सामन्यांत दोन शतके आणि एक अर्धशतक झळकावले होते. या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला मालिकावीरचा पुरस्कारही मिळाला होता. विराट कोहलीने सिद्ध केले आहे की, जरी त्याने इतर फॉरमॅटमधून संन्यास घेतला असला, तरी एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याची बॅट अजूनही धावा ओकत आहे.कोहलीचा विजयरथ सुरूच २०२५ मध्येही विराटची बॅट धावा ओकत आहे.

## विजय हजारे ट्रॉफीत बंगालचा दणदणीत विजय

### जम्मू-कश्मीरला अवघ्या ६३ धावांत गुंडाळले, शमीची चालली जादू



मुंबई-विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेतील ग्रुप-बीच्या सामन्यात बंगालनं जम्मू-कश्मीरवर दणदणीत विजय मिळवला. राजकोटच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यात बंगालच्या गोलंदाजांनी कमाल केली असून जम्मू-कश्मीरला अवघ्या ६३ धावांत रोखले. त्यानंतर बंगालने हे लक्ष्य फक्त ९.३ षटकांत. यात सामन्यात बंगालच्या गोलंदाजांचा पूर्णपणे डंका वाजत होता, ज्यात स्टार वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जम्मू-कश्मीरला ६३ धावांत केलं चितपट : बंगालनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. बंगालच्या तीन वेगवान गोलंदाजांनी जम्मू-कश्मीरच्या फलंदाजांना काहीच संधी दिली नाही. जम्मू-कश्मीरचा संपूर्ण संघ अवघ्या २०.४ षटकांत ६३ धावांवर बाद झाला. यात फक्त दोन फलंदाजांनीच दहा धावांचा टप्पा ओलांडला. हा जम्मू-कश्मीरच्या लिस्ट-ए क्रिकेट इतिहासातील सर्वात कमी धावसंख्येचा विक्रम आहे.शमीच्या गोलंदाजीची जादू : गोलंदाजीमध्ये मुकेश कुमारनं ४ विकेट्स घेतल्या (१६ धावा ६ षटकांत), आकाश दीपनंही ४ विकेट्स मिळवल्या (३२ धावा ८.४ षटकांत), तर मोहम्मद शमीनं ६ षटकांत २ मेडन ओव्हर्स टाकत १४ धावांत २ बळी घेतले. शमीनं सामन्याच्या दुसऱ्याच चेंडूवर विकेट घेऊन सुरुवात केली आणि बंगालला मजबूत स्थितीत आणले. बंगालच्या या त्रिकुटानं जम्मू-कश्मीरच्या फलंदाजीला पूर्णपणे उद्ध्वस्त केलं. अवघ्या ४५ चेंडूत गाठलं लक्ष्य : ६४ धावांच्या छोट्या लक्ष्याचा पाठलाग करताना बंगालनं अतिशय आक्रमक फलंदाजी केली. अभिषेक पोरेलनं ३० धावा तर सुदीप कुमार घारामीनं २५ धावा करत संघाला विजय मिळवून दिला. बंगालनं हे लक्ष्य फक्त ९.३ षटकांत (५७ चेंडूत) गाठलं आणि ९ विकेट्स राखून विजय नोंदवला. हा सामना बंगालच्या दृष्टीनं एकतर्फी ठरलाय.बंगालला चार सामन्यांत तिसरा विजय : या विजयासह बंगालला चार सामन्यांत तिसरा विजय मिळाला आणि त्यांचं १२ गुण झाले. ग्रुप-बीमध्ये बंगालची स्थिती मजबूत झाली आहे. आता बंगालचा पुढचा सामना ३ जानेवारीला असम विरुद्ध होईल, ज्यात पुन्हा एकदा शमी, मुकेश आणि आकाश दीप यांच्या गोलंदाजीवर सर्वांच्या नजरा राहतील.

## क्रिडाविश्वात शोककळा! स्टार क्रिकेटपटूचे वयाच्या ३४ व्या वर्षी निधन, ८ वर्षांची मृत्यूशी झुंज अखेर संपली



कोलंबो -श्रीलंका क्रिकेट विश्वातून एक अत्यंत दु:खद वार्ता समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून मृत्यूशी झुंज देणाऱ्या एका युवा खेळाडूने अखेरचा श्वास घेतला असून, या बातमीमुळे क्रीडा क्षेत्रात मोठी शोककळा पसरली आहे. या स्टार खेळाडूचा प्रवास एका भीषण अपघातामुळे काळवंडला होता, ज्याचा अंत आता अत्यंत वेदनादायक झाल्याने सध्या क्रिडाविश्वात खळबळ उडाल्याचं पहायला मिळतंय. हा खेळाडू दुसरा तिसरा कुणी नसून माजी क्रिकेटपटू अक्षु फर्नांडो आहे.

अवघ्या २७ व्या वर्षी भीषण अपघात

श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू अक्षु फर्नांडो यांचे निधन झालं असून तो २०१० च्या अंडर १९ वर्ल्ड कप टीमचा महत्त्वाचा हिस्सा होता. कोलंबो येथे रेल्वे रूळ ओलांडत असताना झालेल्या एका दुर्दैवी ट्रेन अपघातात त्याला गंभीर दुखापत झाली होती. या घटनेनंतर तो कित्येक वर्षे कोमात होता आणि लाइफ सपोर्टवर आपली जगण्याची लढाई लढत होता. वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी त्याच्यासोबत हा भीषण अपघात घडला होता.

अक्षु फर्नांडो कोण होता?

अक्षु हा उजव्या हाताचा फलंदाज होता आणि विशेष म्हणजे या अपघाताच्या काही दिवस आधीच त्याने आपल्या प्रथम श्रेणी क्रिकेट कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले होते. ९ वर्षांच्या डोमेस्टिक करियरमध्ये त्याने कोल्ट्स, पानादुरा आणि चिलाव स्पोर्ट्स क्लब अशा विविध नामांकित क्लब्सचे प्रतिनिधित्व केले होते. त्याच्या नावावर वरिष्ठ स्तरावर ७ अर्धशतकांची नोंद आहे. आंतरराष्ट्रीय कॉमेंटेटर रोशन अभयसिंघे यांनी अक्षुला श्रद्धांजली वाहताना एक ''नेकदिल आणि हसरा तरुण'' अशा शब्दांत त्याच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

गुणवान खेळाडू गमावला

दरम्यान, आकड्यांचा विचार केला तर अक्षुने ३९ फर्स्ट क्लास मॅचमध्ये १०६७ रन्स केले होते. तसेच २० लिस्ट ए सामन्यांमध्ये त्याने २९८ रन्स बनवले होते. त्याच्या जाण्याने श्रीलंका क्रिकेटने एक गुणवान खेळाडू गमावला, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही.




अमेरिकेतील शिकागो येथे एनबीएच्या नियमित हंगामातील बास्केटबॉल सामन्यात भाग घेताना मिनेसोटा टिम्बरवुल्व्हज आणि शिकागो बुल्सच्या खेळाडू.

# बाई - काकाजी पॉलिमर्स लि. कंपनीचा लिस्टिंग समारंभ थाटात पार पडला

## लातूरच्या उद्योजकीय विश्वात प्रथमच हा सोहळा लातुरात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** :येथील बाई - काकाजी पॉलिमर्स लि. या कंपनीने लातूर जिल्ह्यातील पहिली आयपीओधारक कंपनी होण्याचा मान पटकावला असून या कंपनीचा लिस्टिंग समारंभ बुधवारी सकाळी दहा वाजता लातूरच्या कार्निव्हल रिसॉर्टमध्ये शानदार सोहळ्यात पार पडला.

यावेळी राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी मंत्री आ. अमित देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. दीप प्रज्वलन आणि बाई - काकाजी यांच्या प्रतिमेच्या अभिवादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी बॉंबे स्टॉक एक्सचेंजचे राम गिरी, बँकिंग पार्टनर अभिजित पांडे, बाई - काकाजी ग्रुपचे प्रमुख बालकिशन मुंदडा, नरसिंगदास मुंदडा, दिलीप मुंदडा, हरिकिशन मुंदडा, प्रमोद मुंदडा, आकाश मुंदडा,अक्षय मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. एखाद्या कंपनीचे एक्सचेंजवर सार्वजनिकरित्या व्यवहार होण्याचा हा लिस्टिंग समारंभ मुंबई सारख्या महानगरात होत असतो. मात्र, बाई - काकाजी पॉलिमर्स लि . चा हा सोहळा विशेष करून लातूर शहरात घेण्याची आग्रही




मागणी बाई - काकाजी समूहातर्फे लावून धरण्यात आल्याने हा सोहळा लातूरच्या उद्योजकीय विश्वात प्रथमच लातुरात पार पडला. या सोहळ्याची सुरुवात सकाळी ठीक दहा वाजता राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आ. अमित देशमुख यांच्या हस्ते घंटा वाजवून करण्यात आली. यावेळी आपले विचार व्यक्त करताना इंद्रनील नाईक यांनी बाई - काकाजी समूहाने आजपर्यंत कमावलेल्या सर्वांच्या विश्वासाच्या बळावर हा टप्पा गाठल्याचे सांगितले. भारताच्या एकूण जीडीपीत सर्वाधिक योगदान महाराष्ट्राचे राहत आले आहे. प्रत्येकाने शेअर बाजारातील ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्राचा जीडीपीतील प्रथम क्रमांकचे योगदान यापुढेही कायम राहू शकणार आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालन्यानंतर सर्वात मोठी इंडस्ट्री लातुरात आहे. मुंदडा परिवाराच्या या कंपनीच्या माध्यमातून लातूरचे नाव आता उद्योग क्षेत्रात आघाडीवर पोहचण्यास मदत झाली आहे. विकासात उद्योग हा महत्वाचा कणा आहे. शासन कायम उद्योग धंद्यांना प्रोत्साहित करण्याचे काम करत असल्याचे सांगून नाईक यांनी बाई - काकाजी पॉलिमर्स लि . या कंपनीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आ. अमित देशमुख यांनी यावेळी बोलताना आजचा दिवस लातूरच्या उद्योजकीय क्षेत्रासाठी अतिशय आनंदाचा आणि अभिमानाचा असल्याचे सांगितले. आयपीओधारक कंपनीचा लिस्टिंग समारंभ लातूरमध्ये होण्याची ही पहिलीच वेळ आहे. लातूरच्या जडणघडणीत व्यापारी - उद्योजकांचे योगदान सर्वाधिक आहे. लातूरचे दुसरे नाव गुणवत्ता हे असून या गुणवत्तेच्या बळावरच ही कंपनी लिस्टिंग होतेय असे गौरवोदगारही आ. देशमुख यांनी काढले. सगळ्यांच्या उचित योगदानामुळे लातूरच्या विकासाचा पाया मजबूत बनला आहे. स्व. विलासरावजी देशमुख आज आपल्यात असते तर त्यांनाही खूप आनंद झाला असता, ते मुंदडा परिवाराच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभे राहिल्याची आठवणही आ. अमित देशमुख यांनी करून दिली. उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी नवीन उद्योगासाठी प्रयत्न करावा,असे आवाहनही आ. देशमुख यांनी केले.

बाई - काकाजी उद्योग समूहाचे प्रमुख बालकिशन मुंदडा यांनी आपल्या प्रास्ताविकात संघर्ष, अनुशासन आणि विश्वासाच्या बळावर आपल्या कंपनीने हे यश संपादन केले आहे. प्रामाणिकपणे कार्य केल्याने आज आपल्या उद्योग समूहाने भांडवली बाजारामध्ये पदार्पण केले आहे. आजपासून ही कंपनी प्रत्येक गुंतवणूकदाराची आहे. गुंतवणूकदारांना त्यांनी केलेल्या गुंतवणुकीच्या परताव्याबद्दल त्यांनी खात्री दिली. उद्योग समूहाच्या या यशामागे एक समर्पित टीम असून हे सामूहिक यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हरिकिशन मुंदडा यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना आजचा दिवस आपल्या कंपनीसाठी एक मैलाचा दगड ठरला असून ही एका नव्या जबाबदारीची सुरुवात असल्याचे आपण मानतो,असे सांगितले. बँकिंग पार्टनर अभिजित पांडे यांनी आपल्या मनोगतात बाई - काकाजी पॉलिमर्स लि . ही १४२ वी आयपीओ लिस्टेड कंपनी असल्याचे सांगितले. बीएसईचे राम गिरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्यास प्रदीप राठी, माने, लक्ष्मण मोरे, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. चेतन सारडा, सीए प्रकाश कासट , लक्ष्मीकांत कर्वा , एड. संतोष गिल्डा, डॉ. संजय पौळ , डॉ .महिंद्रकर, अतुल देऊळगावकर, अशोक धूत, राधेश्याम धूत, फुलचंद काबरा, बाळू भंसाळी , ओमप्रकाश सारडा, रवींद्र भुतडा, चंदुलाल बलदवा, नितीन कलंत्री अनेक उद्योजक - विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूरच्या शिवानीने 'फॉरेव्हर स्टार मिस इंडिया २०२५' स्पर्धेत रनर- अपचा मान पटकावला






**लातूर/प्रतिनिधी** : जयपूर येथील झी स्टुडिओमध्ये दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या फॉरेव्हर स्टार मिस इंडिया (FSIA) २०२५ च्या भव्य ग्रँड फायनलमध्ये लातूरची कन्या शिवानी हिने उल्लेखनीय कामगिरी करत रनर-अप (द्वितीय क्रमांक) हा मान पटकावला. या राष्ट्रीय स्तरावरील सौंदर्य व व्यक्तिमत्त्व स्पर्धेत तिने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. शिवानी ही लातूर येथील एमबीबीएस अंतिम वर्षाची विद्यार्थिनी असून अभ्यासासोबतच कला, संस्कृती आणि मंचावरील सादरीकरणात ती सातत्याने चमक दाखवत आहे. ती भरतनाट्यम विशारद असून अनेक महाविद्यालयीन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालनही तिने केले आहे. यापूर्वी तिने फॉरेव्हर स्टार मिस लातूर २०२५ हा किताब पटकावला होता.

ग्रँड फायनलदरम्यान विविध फेऱ्यांमध्ये आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व, मंचावरील वावर आणि भारतीय संस्कृतीचे प्रभावी सादरीकरण यासाठी शिवानीचे परीक्षकांनी विशेष कौतुक केले. महाराष्ट्राची परंपरा, संस्कृती आणि आधुनिकतेचा सुंदर संगम तिने राष्ट्रीय मंचावर सादर केला.

या यशाबद्दल शिवानीने आपल्या कुटुंबीयांचे, मार्गदर्शकांचे, महाविद्यालयातील प्राध्यापकांचे आणि लातूरकरांचे आभार मानले. हे यश सर्व तरुण मुलींना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा देईल,असे मत तिने व्यक्त केले.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील गणित व भौतिकशास्त्र विषयातील अभ्याससाहित्य पुस्तकांचे प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात गणित व भौतिकशास्त्र विषयातील अभ्याससाहित्य स्वरूपातील तीन शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन कार्यक्रम दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, प्रा. पी. डी. भोसले, डॉ. एस. डी. लोखंडे, डॉ. एम. बी. पंडगे व डॉ. एल. एच. काथवटे लिखित पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमात गणित विषयातील ''टॉपिक्स इन अल्जेब्रा'' (बी.एस्सी. प्रथम वर्ष) तसेच भौतिकशास्त्र विषयातील ''ऑप्टिक्स अँड लेझर्स'' (बी.एस्सी. द्वितीय वर्ष सेमिस्टर चतुर्थ)'' आणि वेव्ह्ज अँड ऑसिलेशन्स'' (बी.



एस्सी. द्वितीय वर्ष सेमिस्टर तृतीय) ही अभ्याससाहित्य पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली. ही सर्व पुस्तके नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रमावर आधारित असून बी.एस्सी. अभ्यासक्रमासह बी.सी.ए., एम.सी.ए. तसेच आय.आय. टी.जेईई व जे.ए.एम. सारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीही उपयुक्त ठरणार आहेत.

सदर प्रकाशन कार्यक्रम दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे,व इतर सदस्य,उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरूडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, शिक्षकवृंद व कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभ्याससाहित्य पुस्तकांमध्ये गणित व भौतिकशास्त्र विषयातील संकल्पना सोप्या, तर्कशुद्ध व व्यावहारिक पद्धतीने मांडण्यात आल्या असून विद्यार्थ्यांची संकल्पनात्मक स्पष्टता वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी यापूर्वी गणित विषयावर २५ शैक्षणिक पुस्तके प्रकाशित केली असून त्यांच्या प्रदीर्घ अध्यापन व लेखन अनुभवाचा लाभ या अभ्याससाहित्याला मिळाला आहे. त्यामुळे ही सर्व पुस्तके पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरणार आहेत.

## आंतर झोन क्रिकेट स्पर्धेत लातूर झोन चॅम्पियन



**लातूर/प्रतिनिधी** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर झोन मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत लातूर झोन संघाने विजेतेपद पटकावले. या विजयी लातूर झोन संघात दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथील बी. फार्मसी तृतीय वर्षात शिकत असलेली कु.भाग्यश्री भुसारे हिचा समावेश होता. हिंगोली, नांदेड, उदगीर आणि लातूर हे झोन संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. संघाला क्रिडाशिक्षक श्री. ऋषिकेश मस्के यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, मा. ललितभाई शहा, मा. रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, तसेच कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा यांनी विजयी संघ व कु.भाग्यश्री भुसारे यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांनी देखील कु.भाग्यश्री भुसारे हिचे कौतुक करून तिच्या पुढील शैक्षणिक व क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## श्रीमती सुलोचना पांडे यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी** : श्रीमती सुलोचना बळवंतराव पांडे यांचे आज बुधवारी (दि. ३१ डिसेंबर ) सकाळी ११ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्ष होते.

लातूरमधील जेष्ठ विधिज्ञ संजय पांडे यांच्या त्या मातोश्री तर दिवंगत श्री बळवंतराव पांडे यांच्या पत्नी होत्या. सिद्धेश्वर स्मशानभूमीत सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# सायबर साक्षरतेची आवश्यकता - मुंबई उच्च न्यायालय, कोल्हापूर बेंचचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात सायबर क्रिमिनल कायदा व विश्लेषण या विषयावर सेमिनार

**लातूर/प्रतिनिधी** : सध्याचे युग प्रसारमाध्यमे,मीडियाचे युग असून या युगात तरुणाई ही मोबाईल,फेसबुक,इंटरनेटच्या आभासी जगात जास्तीची रममान होत चालली आहे. त्यामुळे सायबर गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस खूप वाढत चालले आहे. कित्येक लोकांना लाखो रुपयांना लुटले जात आहे.त्यामुळे सायबर साक्षरता ही आधुनिक काळाची खरी गरज बनली आहे.सायबर क्रिमिनल कायदा याचेही ज्ञान प्रत्येकांनी घेतले पाहिजे.तरुणाईने अन्न,वस्त्र,निवारा व आरोग्य या मूलभूत गरजांप्रमाणे मोबाईलची गरज चांगले ज्ञान व चांगल्या कामासाठी केली पाहिजे.चुकीच्या लिंकपासून सावध राहिले पाहिजे.याचबरोबर समाजजीवनात वावरत असताना आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो याची जाणीव ठेवूनच खुशीग्राम प्रकल्प फाऊंडेशनचे मधुकर सोनवणे व वर्षाताई सोनवणे हे कित्येक अनाथ मुलांचा निस्वार्थपणे सांभाळ करीत आहेत. त्यांच्या नावातच सोनं आहे,त्याप्रमाणे ते मुलांचे आयुष्य सोनेरी करण्याचे प्रेरणादायी कार्य करीत आहेत.त्यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा,असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालय,कोल्हापूर बेंचचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालय व दयानंद माजी विद्यार्थी फाऊंडेशनतर्फे दि.३० डिसेंबर २०२५ रोजी सायबर क्रिमिनल कायदा व विश्लेषण या विषयावर उद्बोधनपर सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी सुभेदार रामजी नगर येथील खुशीग्राम प्रकल्प फाऊंडेशनचे मधुकर सोनवणे व सौ. वर्षाताई सोनवणे या दाम्पत्यांना आर्थिक मदत देण्यात आली.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,दयानंद माजी विद्यार्थी फाऊंडेशनचे अध्यक्ष उमाकांत आंग्रे,सचिव संजय ढाले,खुशीग्राम प्रकल्प फाऊंडेशनचे मधुकर सोनवणे व सौ.वर्षाताई सोनवणे,प्रकाश देशमुख,हणमंत गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी दयानंद माजी विद्यार्थी फाऊंडेशनी राबविलेले विविध उपक्रम हे संस्थेचे व महाविद्यालयाचे उंची वाढविणारे आहेत.दयानंद माजी विद्यार्थी फाऊंडेशन सर्वात



उत्कृष्ट असून महाविद्यालयाचा नॅकचा दर्जा वाढविण्यात त्यांचे कार्य मोलाचे ठरले आहे असे त्यांनी सांगितले.सूत्रसंचालन व आभार प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी उत्कृष्टरित्या केले.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,दयानंद माजी विद्यार्थी फाऊंडेशनचे सर्व कार्यकारी मंडळ व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# अंधश्रध्दा निर्मुलन समितीचा सभासद नोंदणी उपक्रम संपन्न

**धाराशिव/प्रतिनिधी** : महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती धाराशिव शाखेत दि. ३०/१२/२०२५ रोजी धाराशिव येथे व्यसनमुक्ती अंधश्रध्दा निर्मुलन व सभासद नोंदणी उपक्रम घेण्यात आला. यावेळी अनिसाचे राज्य सरचिटणीस उत्रेश्वर बिराजदार म्हणाले की, अनिस हे महाराष्ट्रात पंचसुत्रीनुसार कार्य करते. शोषण करणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या आणि दिशाभूल करणाऱ्या अंधश्रध्दांना विरोध.

वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार, प्रसार आणि अंगीकार करणे. धर्माची विधायक, कृतीशिल आणि कालसुसंगत चिकित्सा करणे, संत व समाजसुधारकांचे विचार आणि संविधानाचा मुल्य असे कृतीशिल करणे व्यापक परिवर्तनाच्या चळवळीशी स्वत:ला जोडून घेणे. तेव्हा समाजातील युवक-युवती, स्त्री-पुरुष यांनी अनिसचे सभासद होवून डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्यासाठी प्रयत्न करुया. अनिसचे सभासद होवून चळवळीचे भागीदार होवू असे




आवाहन त्यांनी केले. यावेळीच संघटनेचे क्रियाशील कार्यकर्ते ॲड. अजय वाघाळे यांनी केले. याप्रसंगी लोखंडाच्या साखळीतून गोल कडी बाजूस करणे. एका प्रश्नचिन्हासारख्या हुकामध्ये बेल्ट करंगळीवर तोलून धरणे असे विविध प्रयोग करुन समाजात सामान्यांची कशी फसवणूक होते हे सप्रमाण दाखवून दिले. यावेळी ॲड. अरुणा गवई यांनी समाजात अंधश्रध्दांना बळी पडण्याचे प्रमाण स्त्रीयामध्ये जास्त आहे. तेंव्हा स्त्रीयांनी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगुन जीवनात कार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संघटनेचे विजय गायकवाड यांनी संघटनेची भूमिका विशद करुन अनिसमध्ये जास्तीत जास्त जनतेने सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संघटनेचे सिध्देश्वर बेलुरे, अब्दूल लतीफ, गणेश वाघमारे, वामन पंडागळे, प्रशांत मते इत्यादींची उपस्थित होती.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## बाणगंगा कारखान्यावर आंदोलन करताच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले पैसे



धाराशिव (प्रतिनिधी)- भूम तालुक्यातील बानगंगा (आयान) साखर कारखान्याने गाळप सुरू करून दोन महिने उलटले तरी आतापर्यंत शेतकऱ्यांना ऊस बिले न दिल्यामुळे या कारखान्यावर शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली दुपारी बारा वाजले पासून आंदोलन करण्यात आले. आंदोलन सुरू होताच लागलीच कारखान्याचे संचालक मंडळ खडबडून जागे झाले व तात्काळ आंदोलक शेतकऱ्यांच्या बँक खात्याला रखमा जमा झाल्याचे मेसेज येऊ लागले त्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले, त्यावेळी समाधान शिंदे, रणजीत शिंदे, परंडा तालुकाध्यक्ष अशोक कारकर, ज्ञानेश्वर शिंदे, संतोष किरडे, विजय शिंदे, आकाश नवले, हनुमंत शिंदे, नागेश शिंदे, श्रीधर शिंदे, भूम तालुकाध्यक्ष प्रफुल्ल खैरे, नितीन शिंदे, विजय डमरे, संतोष शिंदे, दत्तात्रय शिंदे, नारायण तनपुरे, बाबा सांगडे, अनिल शिंदे, विष्णु शिंदे, गणेश नवले, अश्रूबा मोरे, शहाजी अडसूळ, सत्यवान शिंदे, श्रीहरी शिंदे, सिताराम लोंढे आदींसह पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

यावेळी शंकर गायकवाड म्हणाले की, आज प्रति टन २८०० रुपये जमा करण्यात आले असले तरी पहिली उचल प्रति टन तीन हजार रुपये आमच्या मागणीप्रमाणे संचालक मंडळाने दहा दिवसात देण्याचे कबूल केले असून उर्वरित दहा दिवसात न आल्यास पुन्हा गव्हाण व काटा बंद आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी गायकवाड यांनी दिला यावेळी या कारखान्याचे एम.डी. संतोष तोंडले, शेतकी अधिकारी श्री. कुदळे, व्हाईस चेअरमनसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या आंदोलनाचा चूक पोलीस बंदोबस्त परंडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठेवला होता.

## सर्व धर्मीयांचे श्रध्दा स्थान हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी यांच्या ७२० व्या ऊरुसास सुरुवात




धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्याला ऐतिहासिक असा रुढी परंपरा आणि पर्यटन,धार्मिक स्थळांचा वारसा लाभलेला आहे,हिंदु मुस्लिम सह इतर धर्मांचा आदर करित सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन सण उत्सव साजरा करतात,सण उत्सव साजरा करतांना ते शांतता आणि सुव्यवस्था राखुन साजरा केले पाहिजेत असे सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे यांनी म्हण्टले.धाराशिव शहरात प्राचीन असा दर्गाह सुफी संत ख्वाजा शमशोद्दीन गाजी यांच्या नावाने ओळखला जात असुन त्यांनी मानवतेचा संदेश दिला आहे, त्यांच्या स्मृतीस उजाळा म्हणुन दरवर्षी ऊरुस अथवा यात्रा उत्सव मोठ्या प्रमाणावर भरला जातो,हिंदु मुस्लिम सर्व धर्मीयांचे श्रध्दा स्थान असलेल्या हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी यांचा ऊरुस दहा दिवस साजरा होतो,दि.२ जानेवारी पासुन सुरु होत असलेला उरुस दि.११ जानेवारी पर्यंत चालणार असुन त्यातील कार्यक्रम असे आहेत,दि.२ जानेवारी (शुक्रवार): पंखा मिरवणूक (ऊरुसचा प्रारंभ),दि.३ जानेवारी (शनिवार): सेहरा मिरवणूक,दि.४ जानेवारी (रविवार): गुसल पाणी मिरवणूक कार्यक्रम,दि.५ जानेवारी (सोमवार): मुख्य संदल मिरवणूक व महफिल-ए-समा,दि.६ जानेवारी (मंगळवार): चिरागा कार्यक्रम, कव्वाली व महफिल-ए-समा,दि.७ जानेवारी (बुधवार): कव्वाली कार्यक्रम व जियारत,दि.८ जानेवारी (गुरुवार) वाजबयान कार्यक्रम व नाते शरीफ,दि.९ जानेवारी (शुक्रवार): मुशायरा,दि.१० जानेवारी (शनिवार): गझल कार्यक्रम,दि.११ जानेवारी (रविवार): कुस्ती,आतषबाजी व उरुस समाप्ती.या जत्रेत सर्व जाती धर्माचे लोक एकोप्याने सामील होऊन रुढी परंपरेतुन कायम सोबत आहेत याची साक्ष देतात,आज ऊरुसास सुरुवात झाली असून परंपरेनुसार संदल मिरवणुकीतुन या संताला अभिवादनाचा प्रथम मान जिल्हाधिकारी साहेबांना दिला जातो व नंतर सर्वजण याला नतमस्तक होतात,गरज राहिल वास्तवतेची.. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे,प्रशासन काळजी घेतेय आपणही घेतली पाहिजे,सर्व जाती धर्माचे प्रतिक असणाऱ्या या ऊरुसास शांततेने आपण सर्वजण पार पाडु या नविन वर्षाचे स्वागत आपण करुया,असे आवाहन गणेश वाघमारे सामाजिक कार्यकर्ते तथा उपाध्यक्ष,पर्यटन जनजागृती संस्था धाराशिव संचलित पर्यटन विकास समिती धाराशिवच्या वतीने केले आहे.

## उरुसात भाविकांना निवासाची सुविधा उपलब्ध करुन... नगराध्यक्ष काकडे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



धाराशिव (प्रतिनिधी) - येथील हजरत ख्वॉजा शमशोदीन गाजी रहे. यांचा उरूस चालू झाला असून दर्शनासाठी भक्त महाराष्ट्रासह शेजारील राज्यातील भक्त येतात. त्यांना निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. मात्र, त्यांना निवासाची सुविधा अपुरी पडत असून ठेकेदाराने भ्रष्टाचार केला आहे. त्यामुळे त्या कामाची चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करण्यासह भाविकांना निवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सना महेमूद मुजावर यांनी एका निवेदनाद्वारे नूतन नगराध्यक्ष नेहा काकडे यांच्याकडे दि.३१ डिसेंबर रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, हजरत ख्वॉजा शमशोदीन गाजी रहे. यांचा उरूस सुरू असून भाविकांना राहण्यासाठी मोठे हाल होत आहेत. तेथे निवास कामे अपूर्ण असून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत आहे. तर यावर्षी भक्तांची संख्या देखील अधिक असणार आहे.

त्यामुळे संबंधित ठेकेदाराच्या कामाची चौकशी करून कारवाई करावी. तसेच सर्व सामान्य भक्तांना भक्त निवास पूर्ण करून द्यावे. या यात्रेच्या कालावधीत स्वच्छतेची काळजी घ्यावी अशी मागणी मुजावर यांनी केली आहे.

## मानवतेच्या संचिताची परंपरा जोपासणा करणे गरजेच-डॉ. सुधाकर शेंडगे




कळंब (प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय , कळंब आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २९ व ३० डिसेंबर रोजी दोन दिवशीय कार्यशाळा संस्थेचे सचिव, डॉ .अशोकराव मोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी उपस्थित मार्गदर्शक डॉ.सुधाकर शेंडगे संचालक व विभाग प्रमुख आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग याप्रसंगी म्हणाले , वर्गाच्या बाहेर असणाऱ्या माणसांनी इतिहास घडवलेला आहे .ज्यांनी मानवतेचे, संस्कृतीचे संचित समोर आणले .माणुसकीचे वलय येण्यासाठी मानवतेच्या संचिताची परंपरा जोपासण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यशाळेच्या समारोप समारंभाची सुरुवात कै.मोहेकर गुरुजी यांच्या प्रतिमापूजनाने झाली .याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले डॉ.अनंतराव शिंदे लातूर यांनी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय काळाची गरज या विषयावर सखोल विचार मांडले .ते म्हणाले ,दूध हा अन्नसाखळीतील एक अविभाज्य घटक असून गरजेनुसार पुरवठा होण्यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे .भारताचा दुग्ध उत्पादनात पहिला क्रमांक असून दुग्धजन्य पदार्थांच्या किमती वाढत आहेत त्यामुळे दुग्ध व्यवसाय काळाची गरज असल्याचे नमूद केले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हेमंत भगवान तर सिनेट सदस्य डॉ. संजय कांबळे, संचालक वसंतराव मडके, उपप्राचार्य कमलाकर जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचा वृत्तांत कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ .दादाराव गुंडरे यांनी सादर केला.

या कार्यशाळेच्या उपक्रमाबद्दल संचालकांनी अभिनंदन केले. कार्यशाळेच्या समारोपाचे सूत्रसंचालन डॉ .सर वदे वर्षा तर आभार डॉ. मीनाक्षी जाधव यांनी मानले. यावेळी प्रा .अर्चना मुखेडकर ,प्रा .डॉ .दीपक सूर्यवंशी , डॉ. ज्ञानेश चिंते , डॉ जयवंत ढोले ,डॉ. श्रीकांत भोसले,प्रा .शाहरुख शेख, प्रा .समाधान चंदनशिवे, प्रा. मारुती शिंपले प्रा. लोहकरे मॅडम, प्रा.प्रणिता खोसे, प्रा . घाटपारडे मॅडम तसेच महाविद्यालयातील बहुसंख्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन अधीक्षक श्री हनुमंत जाधव ,डॉ.बालाजी वाघमारे ,प्रा. राम दळवी, श्री.. संतोष मोरे, कमलाकर बंडगर, उमेश साळुंखे, आदित्य मडके यासह अनेकांनी परिश्रम घेतले.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


### धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## धाराशिव जिल्ह्याला नवी दिशा आमदार राणा जगजित सिंह पाटील सरत्या वर्षात विकासाची बीजे रोवली, नवीन वर्षात परिवर्तनाची कापणी



धाराशिव (शेख अंजुम)- धाराशिव जिल्हा आता विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. गेल्या वर्षभरात सुरू झालेल्या विविध पायाभूत व शाश्वत विकासकामांमुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीला गती मिळाली असून, नवीन वर्षात या प्रयत्नांचे ठळक परिणाम दिसून येणार आहेत.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन ऑफ ट्रान्स्फॉर्मेशन (मित्र) चे उपाध्यक्ष तथा तुळजापूरचे भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकारामुळे धाराशिव जिल्ह्याचा विकास नकाशा बदलू लागला आहे.

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गाचे काम वेगाने सुरू असून, यामुळे जिल्ह्याचा दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर श्री तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखडा कार्यान्वित होत असल्याने तुळजापूरसह संपूर्ण जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे. ही दोन्ही महत्त्वाकांक्षी कामे आमदार पाटील यांच्या दूरदृष्टीचे फलित मानली जात आहेत.

**गाजावाजा नव्हे, ठोस कामांवर भर**

कोणताही गवगवा न करता, स्टंटबाजीपासून दूर राहून शांतपणे विकासाचा अजेंडा राबवणे ही आमदार पाटील यांची कार्यपद्धत आहे. विरोधकांच्या बिनबुडाच्या टीकेकडे दुर्लक्ष करून त्यांनी महायुती सरकारकडून अनेक महत्त्वाच्या योजनांना मंजुरी मिळवून घेतली आहे.

यामध्ये नळदुर्ग, वाशी, भूम, परंडा, तामलवाडी, कौडगाव (टप्पा ३) आणि वडगाव सिद्धेश्वर येथे प्रस्तावित एमआयडीसी, येडशी येथील रामलिंग अभयारण्याचा विकास, तुळजापूर येथे प्राणिसंग्रहालयाची उभारणी, तसेच तेरचा जागतिक पर्यटन नकाशावर समावेश यांचा समावेश आहे.

राज्यातील सर्वात प्राचीन तेर येथील त्रिविक्रम मंदिराचा जीर्णोद्धार, संतश्रेष्ठ गोरोबाकाका मंदिरातील विकासकामे आणि तारा प्रकल्पाअंतर्गत तुळजापूर तालुक्यातील माळुंब्रा येथे एक हजार एकरांवरील शेतीआधारित प्रकल्प यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे. स्थानिक पातळीवरच शेतमालाला चांगला दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**पाण्याचा प्रश्न आणि बदलती वास्तवता**

धाराशिव जिल्ह्याच्या विकासाबाबत कायम नकारात्मक चर्चा होत असल्या तरी, जिल्ह्याला नैसर्गिक पाण्याचा शाश्वत स्रोत नसल्याचे वास्तव अनेकदा दुर्लक्षित केले जाते. मात्र, पाणी नाही म्हणून विकास थांबला नाही. माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या प्रयत्नांमुळे सिंचनाखालील क्षेत्र ४ टक्क्यांवरून २१ टक्क्यांपर्यंत वाढले. यामुळे उसासारख्या नगदी पिकामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागला आणि जिल्ह्यात साखर कारखान्यांची संख्या वाढली. आज जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उसापासून दरवर्षी हजार कोटींहून अधिक उत्पन्न मिळत आहे.

**नकारात्मक चर्चेला पूर्णविराम**

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकारामुळे आता या नकारात्मक चर्चेला जवळपास पूर्णविराम मिळाला आहे. उजनी धरणातून धाराशिवसाठी पाणी आणणे, कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी साठवण्यासाठी रामदरा तलाव सज्ज करणे, तसेच सांगली-कोल्हापूर येथील पूरपाणी मराठवाड्याकडे वळवण्याची क्रांतिकारी योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केली आहे. ही योजना मित्र संस्थेच्या माध्यमातून राबवली जाणार आहे. रेल्वेचे काम प्रत्यक्षात दिसू लागले आहे, पाण्याचे दीर्घकालीन उपाय मार्गी लागत आहेत, तुळजापूर विकास आराखड्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे आणि तेरमधील कामांनी राज्याचे लक्ष वेधले आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्याच्या विकासाबाबत जाणूनबुजून पसरवण्यात येणाऱ्या नकारात्मक चर्चेला ठोस ब्रेक लागला आहे. सरत्या वर्षात रोवलेली विकासाची बीजे नवीन वर्षात परिवर्तनाचा वृक्ष बनत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649